
MAHMARI 19358/13/1/2000 - TC



विद्या प्रसारक मंडळ
स्थापना • नौपाडा • ठाणे

व्ही. पी. एम्.

# दिशा

वर्ष अठरावे / अंक ३ / मार्च २०१८

## संपादकीय

### ''प्रेमस्वरूप आई, वात्सल्यसिंधू आई''

साने गुरुजींचे 'श्यामची आई' किंवा माधव ज्युलीयन यांची 'प्रेमस्वरूप आई, वात्सल्यसिंधू आई' ही लताबाईंनी गायलेली कविता ऐकून गहिवरत नाही, असा मराठी मनुष्य सापडणार नाही. वारकरी आपल्या दैवतांना 'माउली' म्हणून संबोधतात. विनोबा भावे यांनी आपल्या गीतेच्या मराठीतील रुपांतराला 'गीताई' म्हणूनच संबोधिले आहे.

आपल्या संस्कृतीमध्ये अनादी कालापासून आईला एक अनन्यसाधारण महत्त्व आहे.

जन्माला आलेली प्रत्येक व्यक्ती ही आईच्या गर्भात ८ ते ९ महिने वाढत असते. गर्भधारणेला वडिलांची गरज असली, तरी गर्भधारणा झालेल्या क्षणापासून जन्मापर्यंत आपण सगळे आईशी जोडलेले असतो. आपली प्रत्येक पेशी आणि अवयवांच्या रचनेपासून ते त्यांच्या कार्यापर्यंतच्या विकासावरच्या प्रत्येक टप्प्यावर आईवडिलांची छाप असते. साहजिकच, जन्माच्या आधीपासून ते जिवनात पुरेशी समज येईपर्यंतचा आपला हा प्रवास, आईचे बोट धरूनच होत असतो.

हे नाते जेवढे तांत्रिक आहे तेवढेच भावनिकही आहे.

बहुसंख्य स्त्रिया या केंव्हातरी 'आई' होतात. पण 'बाई' ची 'आई' होणं ही प्रक्रिया जेवढी साधी वाटते तेवढीच ती गुंतागुंतीचीही आहे. गर्भधारणे नंतर स्त्रीमध्ये होणारा बाह्यबदल हा दृश्य असल्यामुळे मान्य करणे किंवा स्वीकारणे सोपे जाते. स्त्रिच्या भावनाविश्वातील बदलही तिच्या वागण्यामध्ये प्रतिबिंबीत होत असतो.

विज्ञानाला हे सगळे मान्य असले, तरी 'मातृत्वा'च्या भावना उत्तेजित करणारा बदल स्त्रीच्या शरीर रचनेमध्ये कुठे होतो याचा अभ्यास फारच नगण्य झाला आहे.

मेंदू हा माणसाच्या शारीरिक, आणि भावनिक चलनवलनाचे नियंत्रण करतो, हेही शास्त्रसिद्ध आहे. तरीही मेंदू मधल्या कुठल्या भागांमधील रचनांमध्ये मातृत्वामुळे बदल होतो याचा ठाव अजूनपर्यंत घेता येत नव्हता. पौंगडावस्था (Puberty), गर्भधारणा ते रजोनिवृत्ती, ही सगळी स्त्रीमधील स्थित्यंतरं काही संप्रेरकांमुळे (Hormones) होतात हेही

(पृष्ठ क्र २ वर)

(मुखपृष्ठावरून - **संपादकीय)**

विज्ञानाला ठाऊक आहे. तरीही 'मातृत्वा'मुळे मेंदूमधील होणाऱ्या रचनेतील फरकाची ही क्रांतिकारक माहिती मात्र नुकत्याच प्रकाशित झालेल्या एका शोधनिबंधामुळे वैज्ञानिकांना समजली.

'मस्तिष्क' विज्ञानामध्ये संशोधन करणाऱ्या बार्सोलेना, स्पेन आणि लेडन विद्यापीठ, नेदरलँड येथील संशोधकांनी फेब्रुवारी २०१७ च्या (Vol. 20, No.2) NATURE NEUROSCIENCE या शोधपत्रिकेमध्ये Pregnancy leads to long-lasting changes in human brain Structure हा निबंध लिहून विज्ञान जगतामध्ये खळबळ उडवून दिली. या निबंधाच्या सारांशामध्ये ते लिहितात,

"Pregnancy involves radical hormone surges and biological adaptions. However, the effects of pregnancy on the human brain are virtually unknown. Here we show, using a prospective (Pre-Post pregnancy) study involving first-time mothers and fathers and nulliporous control groups, that pregnancy renders substantial changes in brain structure, primarily reductions in gray matter (GM) volume in regions subserving social cognition. The changes were seletive for the mothers and highly consistent, correctly classfying all women as having undergone pregnancy or not inbetween sessions. Interestingly, the volume reductions showed a substantial overlap with brain regions responding to the women's babies postpartum. Furthermore, the GM volume changes of pregnancy predicted measures of postpartum material attachment suggestive of an adaptive process serving the transition into motherhood. Another followup session showed that the GM reductions endured for at least 2 years post-pregnancy. Our data provide the first evidence that pregnancy confers long-lasting changes in a woman's brain."

या निष्कर्षाप्रत येण्याकरता संशोधकांनी अनेक, प्रथमच गर्भधारणा झालेल्या स्त्रिया, त्यांचे जोडीदार, त्याच वयोगटातील इतर पुरुष, आणि कधीही गर्भधारणा न झालेल्या स्त्रिया यांच्या मेंदूचा तुलनात्मक अभ्यास केला. सर्व कसोट्या किंवा निकषावर यशस्वी झालेल्या २५ प्रथमच गर्भधारणा झालेल्या या स्त्रियांच्या मेंदूमधील बदलाचा २ वर्षे सतत अभ्यास करण्यात आला. प्रथम गर्भधारणा झालेल्या या स्त्रियांमधील बदल, २ वर्षांच्या कालावधी पर्यंत तरी तसाच होता. प्रत्यक्ष प्रसुती आणि बाळाच्या संगोपनाची पहिली दोन वर्षे आईच्या दृष्टींनी फारच महत्त्वाची असतात. बाळाचे संगोपन करतांना आपल्या दैनंदिन वागण्याच्या पद्धती आणि वेळापत्रकामध्ये आईला बरेच बदल करायला लागतात. हे बदल व्यावहारिक, सामाजिक, आणि भावनिक या सगळ्या स्तरांवर असतात. यातूनच तिच्या मातृत्वाचा विकास होत असतो.

या संशोधनांनी हे दाखवून दिले की, प्रसूतीनंतर आईच्या मेंदूमधील gray matter (GM) च्या आकारमानामध्ये काही प्रमाणात घट होते. मेंदूच्या Cortex मधील 'सामाजिक बोधाचे' (social cognition) जे क्षेत्र असते त्यामध्ये हा बदल प्रामुख्याने दिसून येतो. हे निरीक्षण आणि त्यामधून निघणारे निष्कर्ष 'मातृत्व' या संकल्पनेच्या पारंपरिक समजुतीला पुष्टी देणारे आहेत.

परंपरेनुसार गर्भधारणा अपेक्षित असलेल्या स्त्रीच्या मानसिकतेपासून, खाण्यापिण्याच्या सवयींची कसोशीने काळजी घेतली जाते. गर्भधारणेकरता आई आणि वडील दोघेही जबाबदार असतात. गर्भधारणा झाल्यावर मात्र गर्भाची वाढ ही आईच्या शरीरातच होत असते. वडील तसेच आईच्या मद्यपान किंवा धुम्रपानाचा गर्भाच्या वाढीवर किती दुष्परिणाम होतात

(पृष्ठ क्र.४० वर)

व्ही.पी.एम्.
# दिशा

विद्या प्रसारक मंडळ
स्थापना • नौपाडा ठाणे • १९३५

**वर्ष अठरावे/अंक ३/मार्च २०१७**

**संपादक**
डॉ. विजय बेडेकर

'दिशा' प्रारंभ जुलै १९९६
(वर्ष २१ वे/अंक ९ वा

**कार्यालय/पत्रव्यवहार**
विद्या प्रसारक मंडळ
डॉ. बेडेकर विद्या मंदिर
नौपाडा, ठाणे - ४०० ६०२
**दूरध्वनी : २५४२ ६२७०**
**www.vpmthane.org**

**मुद्रणस्थळ :**
परफेक्ट प्रिण्टस्,
नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे.
**दूरध्वनी : २५३४ १२९१**
**२५४१ ३५४६**
**Email:perfectprints@gmail.com**

## अनुक्रमणिका

| | | | |
|---|---|---|---|
| १) | संपादकीय | डॉ. विजय बेडेकर | |
| २) | सिंगापूरचे राष्ट्रीय ग्रंथालय | डॉ. सुधाकर आगरकर | ३ |
| ३) | नर्मदा परिक्रमा (भाग : ३७) | श्री. अरविंद ओक | ६ |
| ४) | व्यक्तिवेध-०७ पद्मविभूषण ई. श्रीधरन | श्री. नरेंद्र गोळे | १० |
| ५) | डॉ. वा. ना. बेडेकर जन्मशताब्दीनिमित्त | सौ. साधना जोशी | १२ |
| ६) | ओळख वनस्पतींची गुलाबी तिळवण | श्री. प्रकाश दुधाळकर | १५ |
| ७) | नक्षलवाद व भारत | सहा. प्रा. सुभाष गं. शिंदे | १७ |
| ८) | सुभाषित | प्रा. प्रशांत धर्माधिकारी | २६ |
| ९) | परिसर वार्ता | संकलित | २७ |

या अंकात व्यक्त झालेली मते त्या लेखकांची वैयक्तिक मते असून त्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# व्ही. पी. एम. दिशाच्या संदर्भात

- ❖ आपण दिशा नियमित वाचा. इतरांनाही वाचायला सांगा.
- ❖ हे व्यासपीठ **अभ्यासपूर्ण लेखांसाठी** आहे.
- ❖ शैक्षणिक संस्थेने असे मासिक चालवावे, याचे हे एकमेव उदाहरण आहे.
- ❖ आपण विचारप्रवृत्त लेख पाठवून दिशाला सहकार्य करू शकता.
- ❖ आपण स्वत: देणगीमूल्य द्या व इतरांना द्यायला सांगा.
- ❖ आपले देणगीमूल्य द्यायचे राहिले नाही ना, कृपया पडताळून पाहा.
- ❖ दिशाच्या संदर्भात देणगीमूल्य, लेख पाठवावयाचे असतील तर कार्यवाह, विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर, नौपाडा, ठाणे - ४००६०२ या पत्त्यावर पाठवा. ०२२-२५४२६२७० या क्रमांकावर संपर्क साधा.
- ❖ आपण सार्वजनिक ग्रंथालयाचे संचालक असाल वा असे एखादे ग्रंथालय चालवत असाल, तर आपण सभासद होणे अत्यंत गरजेचे आहे. महाविद्यालये, शाळा यांच्या प्रमुखांनीही आपल्या संस्थेचे देणगीमूल्य पाठवावे.
- ❖ www.vpmthane.org या संकेतस्थळावर दिशाचे जुने अंक आपण पाहू शकता.
- ❖ वार्षिक देणगीमूल्याचा रु. ५००/- चा धनादेश 'विद्या प्रसारक मंडळ A/C दिशा' या नावाने पाठवावा.
- ❖ कृपया वर्गणीदार व्हावे.

- संपादक

# सिंगापूरचे राष्ट्रीय ग्रंथालय

*सिंगापूर शहरात एक सुसज्ज आणि लेखी साहित्याने परिपूर्ण असे ग्रंथालय आहे. या ग्रंथालयाला दिलेल्या भेटीत आलेले अनुभव लेखकाने या लेखात विशद केले आहेत. – संपादक*

जानेवारी महिन्याच्या तिसऱ्या आठवड्यात डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन संस्थेतील विद्यार्थ्यांची सिंगापूर सहल आयोजित करण्यात आली होती. या सहलीचा एक भाग म्हणून सिंगापूरच्या राष्ट्रीय ग्रंथालयाला भेट देण्याचे ठरले. या आधी मी या ग्रंथालयात जाऊन आलेलो आहे. त्यामुळे आगंतुकांसाठी ते ग्रंथालय सफर आयोजित करतात याची मला कल्पना होती. म्हणून मी जाण्यापूर्वी एक विनंती वजा पत्र त्यांना लिहिले. आमची संख्या ४० हून जास्त असल्याने मला जरा धाकधूकच होती. परंतु प्रमुख ग्रंथपालांकडून लगेच माझ्या पत्राचे उत्तर आले. आमच्या सर्व विद्यार्थ्यांसाठी त्यानी ग्रंथालय सफर आयोजित करण्याचे मान्य केले. औपचारिकतेचा एक भाग म्हणून त्यांनी ग्रंथालयाला भेट देणाऱ्या विद्यार्थ्यांची आणि प्राध्यापकांची नावे मागितली. ही माहिती पाठविल्याबरोबर ताबडतोब त्यांनी ग्रंथालय सफरीचा पद्धतशीर कार्यक्रम आखून मला पाठवून दिला. त्याचबरोबर, ग्रंथालयात पोहोचावे कसे याची नकाशासह माहिती पाठविली.

ठरल्याप्रमाणे ठरावीक दिवशी आणि ठरावीक वेळेला आम्ही ग्रंथालयात पोहोचलो. शहराच्या मध्यभागी बुगिस जंक्शन जवळ व्हिक्टोरिया या महत्त्वाच्या रस्त्यावर हे ग्रंथालय आहे. ग्रंथालयाची इमारत नजरेस पडताच आम्ही पटापट त्याचे फोटो घेतले. टी. आर. हमझा आणि केन यियांग या दोन वास्तूविशारदांनी या इमारतीची रचना केली. ग्रंथालयाची इमारत दोन भागात विभागलेली असून प्रत्येक इमारत १६ मजल्यांची आहे. प्रत्येक मजल्यावर दोन इमारतींना जोडणारे पूल बांधण्यात आले आहेत. त्यामुळे एका इमारतीतून दुसऱ्या इमारतीत जाणे सहज शक्य होते. इसवी सन २००४ साली या दोन्ही इमारतींचे काम पूर्ण झाले. त्याच्या पुढच्या वर्षी इतर ठिकाणी असलेला ग्रंथसंग्रह येथे आणण्यात आला. आधी संदर्भ ग्रंथालय आणि सार्वजनिक ग्रंथालय अशी दोन ग्रंथालये दोन वेगवेगळ्या ठिकाणी होती. ही प्रशस्त इमारत उभी झाल्यावर मात्र दोन्ही ग्रंथालये एकत्र करण्यात आली.




**राष्ट्रीय वाचनालयाची सुबक इमारत**

ग्रंथालयाच्या स्वागत कक्षात उप-ग्रंथपाल आम्हाला भेटले. आमची संख्या जास्त असल्याने त्याने दोन गट पाडले. एक गट घेऊन ते निघाले आणि दुसऱ्या गटाला आपल्या एका महिला सहकाऱ्याबरोबर जायला सांगितले. व्यवस्थापन संस्थेचे संचालक डॉ. जोशी पहिल्या गटाबरोबर गेले. मी दुसऱ्या गटात सामील झालो. ती महिला तिथे सहाय्यक ग्रंथपाल म्हणून कार्य करते. तिने आम्हाला सांगितले की सार्वजनिक वाचनालय खालच्या मजल्यावर आहे. तेथे कोणालाही जाण्याची मुभा आहे.

जेव्हा एखादे ध्येय साधण्यासाठी तुमची कुठली योजना काम करीत नसेल तेव्हा योजना बदलणे आवश्यक आहे ना? की नियोजित ध्येय?...

ग्रंथालयाची सफर पूर्ण झाल्यावर आम्हाला तिथे सोडण्याचे आश्वासन देऊन तिने आम्हाला संदर्भ ग्रंथालय पाहण्यासाठी वरच्या मजल्यावर जाण्याची सूचना केली. तिच्या सूचनेवरून आम्ही उद्वाहक गाठायला जाणार त्याआधी तिने आम्हाला संदर्भ ग्रंथालयाची थोडक्यात माहिती दिली. त्या बाईंकडून आम्हाला कळले की हे संदर्भ ग्रंथालय ली कांग चियांग यांच्या नावाने ओळखले जाते. हा माणूस व्यवसायाने डॉक्टर असून त्याने ग्रंथालयासाठी ६० दशलक्ष डॉलर्स एव्हढी मोठी देणगी दिली. ६ ते १३ अशा सात मजल्यांवर हे संदर्भ ग्रंथालय पसरलेले आहे. त्याचे एकूण क्षेत्रफळ १४२६५ चौरस मीटर असून पुस्तकांची संख्या पाच लाखांहून अधिक आहे.



**ग्रंथालयाची माहिती देताना सहायक ग्रंथपाल**

संदर्भ ग्रंथालयाबद्दल त्या बाईंनी एव्हढी माहिती दिली की ते प्रत्यक्ष पाहण्याची उत्सुकता आमच्या मनात निर्माण झाली. लवकरच आम्ही उद्वाहक गाठून सातव्या मजल्यावर पोहोचलो. तेथे विज्ञान आणि तंत्रज्ञान या विषयांचे संदर्भ ग्रंथ उपलब्ध आहेत. पुस्तके पद्धतशीर लावून ठेवलेली असून प्रत्येक पुस्तकावर पुरेसा प्रकाश पडेल अशी व्यवस्था करण्यात आली आहे. हे संदर्भ ग्रंथालय असल्याने वाचकांना येथे येऊन पुस्तक वाचावे लागते. अशा वाचकांसाठी पुरेशा आसनांची व्यवस्था केली असून, वाचन करायला सोयीचे होईल अशी प्रकाश व्यवस्था देखील केली आहे. तेथे काही अभ्यासू लोक वाचन करीत होते. त्यांना त्रास होऊ नये म्हणून आम्ही लवकरच तेथून बाहेर पडलो. त्याआधी तेथे असलेल्या ग्रंथसंपदेवर नजर टाकायला मी विसरलो नाही. एका प्रथितयश विज्ञान संस्थेत मी चार दशके काढली आहेत. त्यामुळे विज्ञान संदर्भ ग्रंथांची मला चांगलीच माहिती आहे. त्या दृष्टीने विचार करता हे ग्रंथालय चांगलेच समृद्ध आहे असे माझे मत झाले.

सातव्या मजल्यावरची सफर संपवून आम्ही वरच्या मजल्यावर पोहोचलो. या मजल्यावर कला आणि समाजशास्त्र या विषयांवरची पुस्तके आहेत. या मजल्यावर असलेल्या ग्रंथावर नजर टाकून आम्ही लवकरच वरच्या मजल्यावर पोहोचलो. नववा मजला प्रादेशिक भाषेतील ग्रंथांसाठी वापरलेला आहे. सिंगापूर हे एक बहुभाषिक राष्ट्र आहे. तेथे चिनी, मलेशियन आणि तमिळ भाषिक लोक राहतात. या तीनही भाषांना तेथे सारखेच महत्त्व आहे. या भाषेत निर्माण केलेली ग्रंथसंपदा तेवढीच समृद्ध आहे. या मजल्यावर ही संपदा जतन करून ठेवली आहे. ग्रंथालयात प्रवेश करण्यापूर्वी एक प्रदर्शन भरविलेले आहे. या प्रदर्शनात स्थानिक भाषेतील काही प्रसिद्ध लेखकांची माहिती दिलेली आहे.



**दानशूर व्यक्तिचा पुतळा**

ग्रंथालयाच्या दहाव्या आणि अकराव्या मजल्यावर सिंगापूर आणि दक्षिण पूर्व आशिया या परिसरासंबंधी केलेले आणि या परिसरातील लेखकांनी केलेले इंग्रजी लेखन आहे. ग्रंथालयात शिरण्यापूर्वी येथे देखील एक प्रदर्शन भरवलेलेआहे. त्या प्रदर्शनात या देशातील प्रमुख

लेखकांची माहिती दिलेली आहे. ते पाहून आपण जेव्हा ग्रंथालयाच्या कक्षेत प्रवेश करतो तेव्हा आपले मन मोहून जाते. किती वेगवेगळ्या विषयांवर या परिसरातील लोकांनी लेखन केले याची आपल्याला चांगली कल्पना येते. येथे देखील पुस्तकांची रचना, वाचन करण्यासाठी लागणारी व्यवस्था अतिशय उत्तम आहे. दहावा मजला पाहून झाल्यावर ग्रंथपाल बाईंनी आम्हाला अकराव्या मजल्यावर नेले. तेथे फेरफटका मारून झाल्यावर सफर संपल्याचे आमच्या मार्गदर्शिकेने सुचीत केले. हे आम्हाला अनपेक्षित होते. कारण आम्ही सफरीचा आनंद घेत होतो. अजून दोन मजले शिल्लक असताना सफर का संपविली? असा प्रश्न आम्हा सगळ्यांना पडला. आमच्या मार्गदर्शिकेने बहुधा ते ताडले असावे. तिने आम्हाला सांगितले की वरच्या मजल्यावर राखीव अशी ग्रंथसंपदा आहे. ग्रंथालयाच्या नियमित सभासदांनाच तेथे प्रवेश आहे. इतरांना तेथे जायचे असेल तर संचालकांची विशेष परवानगी घ्यावी लागते. तशी परवानगी आपल्याकडे नसल्याने आपल्याला तेथे जाता येणार नाही. तिचे म्हणणे ऐकून आम्ही जरा निराश झालो. परंतु तिच्या पुढच्या वाक्याने मात्र आम्ही खूश झालो. तिने असे सांगितले की, दहाव्या मजल्यावर एक ठिकाण असे आहे तेथून शहराचे मनोहारी दृश्य पाहता येते. क्षणाचा विलंब न करता आम्ही तिथे पोहोचलो. आमच्यापैकी प्रत्येकाने तेथून शहराची छायाचित्रे घेतली. त्यापैकी एक छायाचित्र खाली दिलेले आहे.



**दहाव्या मजल्यावरून दिसणारे मनोहारी दृश्य**

संदर्भ ग्रंथालयाची सफर संपवून आम्ही तळमजल्यावर परत आलो. या सफरीत दुसऱ्या मजल्यापासून सहाव्या मजल्यापर्यंतचा भाग का घेतला नाही? असा प्रश्न आम्हाला सगळ्यांना पडला. धाडस करून मी तसे विचारले. तेव्हा मार्गदर्शन करणाऱ्या बाईंनी सांगितले की, हे मजले नाट्य आणि कला या विभागाला दिलेले आहेत. तेथे एक मोठे नाट्यगृह देखील आहे. ग्रंथालयात नाट्यगृह ही कल्पनाच मला कौतुकास्पद वाटली. त्या विभागात जायला मला नक्कीच आवडले असते. परंतु त्या दिवशी तिथे काही विशेष चालू नव्हते. त्यामुळे तिथे जाण्यात काही अर्थ नव्हता. असे असले तरी तळमजल्याखाली जाण्याची संधी आम्हाला उपलब्ध होती. आधी सांगितल्याप्रमाणे जमिनीखाली असलेल्या मजल्यावर सार्वजनिक वाचनालय होते. तेथे कोणालाही जाण्याची परवानगी आहे. ते पाहण्याची सूचना आम्हाला देऊन मार्गदर्शिकेने रजा घेतली.

आमचे विद्यार्थी जरा थकलेले होते. सार्वजनिक वाचनालयात जाण्याची फारशी उत्सुकता त्यांच्यात दिसत नव्हती. रात्रभर प्रवास करून त्याच दिवशी आम्ही सिंगापूरला पोहोचलो होतो. सगळ्यांनाच प्रवासाचा थकवा जाणवत होता. त्यामुळे आम्ही सार्वजनिक वाचनालयात न जाता हॉटेलकडे जाणे पसंत केले. या भेटीत जरी आम्हाला सार्वजनिक ग्रंथालयात जाता आले नाही तरी याआधीच्या भेटीत मी तेथे गेलो होतो. हे ग्रंथालय विविध विषयांवरील पुस्तकांनी समृद्ध असून वाचकांना बसण्यासाठी प्रशस्त अशी जागा आहे. या ग्रंथालयाचे एक वैशिष्ट्य असे की, तेथे मुलांसाठी वेगळा विभाग आहे. छापील पुस्तकांबरोबरच तेथे डिजिटल साहित्य देखील उपलब्ध आहे. एखाद्या व्यक्तिला पुस्तक किंवा डिजिटल साहित्य हवे असेल तर ठरावीक कालावधीसाठी ते घरी घेऊन जाऊ शकतात.

(पृष्ठ क्र. १६ वर)

# नर्मदा परिक्रमा

**भाग : ३७**

*नर्मदा परिक्रमेतील हा पुढचा टप्पा. लेखकाचे चौफेर निरीक्षण, भेटलेली माणसे या नोंदी वाचण्यासारख्या आहेत - संपादक*

**रविवार दि. २४ फेब्रुवारी २०१३ दिवस ९१ वा. गुतलवाह-शहपुरा-बस-अमरकंटक मुक्काम शान्तिधाम**

रात्रभर पाऊस पडत होता. सकाळी गहरुभाऊ सहा वाजता आले. गावात पाणी नाही. दूर दोन विहिरी आहेत. एकमेकांच्या विरुद्ध दिशेला. स्नानासाठी त्यातल्या एका विहिरीवर ते आम्हाला घेऊन गेले. अंतर १/२ कि.मी.

स्नानोत्तर चहापान करून साडे-सातच्या आधीच कधी नव्हे ते पुढे निघालो. रात्री बाहेर थंड वारा होता. परंतु दार नसूनही खोलीत वारा शिरत नव्हता. हवा थंड होती. पण ऊन हळूहळू तीव्र व्हायला लागले. वाटेतच उन्हामध्ये आम्ही रस्त्याच्या कडेला बसून जवळ होते ते खाल्ले, पण सावली असती तर बरे झाले असते असे वाटले.

११ कि.मी. चाल झाल्यावर शहपुरा आले. उन्हाचा त्रास सहन होत नाही. त्यामुळे बसने निघून दूर जाण्याचा माझा विचार, जो गेले पंधरा दिवस अंमलात आला नव्हता, तो आज नक्की झाला.

ब्रेकफास्टच्या वेळीच मी पाचशे रुपये बन्सीला दिले. काल घेतलेला पंचासुद्धा या विचारानेच घ्यायला लावला होता. कारण परिक्रमा पायी पुरी करायचा माझा उत्साह मावळला होता; रोज सकाळ/विशेषतः संध्याकाळी भोजनासाठी याचना करायची याचा मला वैताग यायला लागला होता.

रोज संध्याकाळी निवासाची व्यवस्था म्हणजे पोटात गोळा यायचा.

शहपुरा आले. आम्ही भोजनालयात थाळी मागवून जेवलो. बन्सीला देऊनही १००० रु. होते. त्यामुळे ATM वापरले नाही. अमरकंटक बस येऊन थांबली होती. बसमध्ये चढण्यापूर्वी परिक्रमा मार्गदर्शिका बन्सीला दिली. बन्सीने निरोपाची मला मिठी मारली ती बराच वेळ सोडली नाही. मिठी सुटली तेव्हा दोघांचेही डोळे पाण्याने भरले होते / अश्रूंनी डबडबले होते.

गेले कित्येक दिवस, जवळपास दोन-तीन आठवडे, मला बन्सीने सोडले नाही. माझ्या चालीने, मला हवे तेव्हां, हवे तिथे तो थांबला होता, त्याच बन्सीला मी मात्र निष्ठुरतेनेच म्हणायला हवे, आज एकटा टाकून चाललो होतो.

जोगी टिकरियाला उतरून पुढे चालत अमरकंटक गाठावे असा मुळात विचार होता. परंतु थेट बस म्हटल्यावर विचार बदलून थेट तिकीट काढले. अमरकंटकाकडे येताना जो भूभाग मागे सरकत होता, तो आपण चालणार होतो. गेले नव्वद दिवस अशाच वाटेने आपण चालत होतो. या विचाराने वेडपटासारखे वाटायला लागले. मैलोन्मैल वाहन व्यवस्था असताना, निर्मनुष्यभाग पायी तुडवायची खरंच काही गरज आहे का? असा विचार मनात आला.

वाटेत लागणारी छोटी गावे, बाजारपेठा पाहिल्या की वाटायचे अशा ठिकाणी कुठेही राहायला मिळणे शक्य नाही. पण वस्तुस्थिती अशाच परिस्थितीत आम्ही आजवर रोज हेच करीत होतो!

---

कधीही मूर्खाशी वाद घालू नका. तो तुम्हाला आपल्या पातळीवर आणून, आपल्या अनुभवाने हरवून टाकेल!

बस प्रत्येक गावात प्रत्येक फाट्यावर थांबत थांबत दुपारी ३ ते रात्री ११ असा प्रवास करत अमरकंटकला पोहोचलो. बसमध्ये बसल्यावर लगेच सचिनला फोन केला. २४/२६/२८ तारखांना तिकिटे उपलब्ध होती. त्यातली २८ तारीख नक्की करून सचिनने II AC चे सकाळी १० चे रेल्वे तिकीट जबलपूरपासून काढले आहे.

लष्करी छावणीत दोन दिवस राहण्याची व्यवस्था होत आहे. अमरकंटकाच्या शान्ती आश्रमात, हॉलमध्ये बसून डायरी लिहितोय. रात्रीचे अकरा वाजले आहेत. गुजराथची एक ट्रॅव्हल बस इथे आली आहे, त्यांनी मला भोजन दिले!

परत येतोय ही गोष्ट चौबळ, कैलास यांना कळविली.

**सोमवार दि. २५ फेब्रुवारी २०१३ दिवस ९२ वा. मुक्काम शान्तिकुटी–अमरकंटक**

काल रात्री बसमधून उतरलो तेव्हा ८।। वाजले होते. कोणत्याही आश्रमात परिक्रमावासी फार उशिरा पोहोचत नाहीत. विशेषतः अंधार पडायच्या आत निवास शोधायचा असतो. संध्याकाळी बस पोहोचेल असे वाटले होते. मी बस १।। वाजता धरली अशी माझी कल्पना होती. प्रत्यक्षात ३ वाजता बस धरली होती. त्यातून बस दूर अंतराची असली तरी गावकऱ्यांच्या सोयीसाठी होती. त्यामुळे बस प्रवासाला अधिक वेळ लागत होता.

जसजसा अंधार पडायला लागला तसतशी माझी चिंता वाढायला लागली. उशिरा येणारा परिक्रमावासी आहे का? का उशीर झाला? कोणत्या ठिकाणाहून सकाळी निघाला इ. प्रश्न विचारले जातील आणि परिणामी आश्रय मिळणार नाही असे वाटत होते.

बस थेट अमरकंटक नसती तर कदाचित /खचित जागी टिकरियाला उतरून मुक्काम केला असता व पाच कि.मी. चालून राजेन्द्रनगर पासून बसने अमरकंटक गाठले असते.

असो, बसमधून उतरलो आणि समोर दिसत होता त्या आश्रमात शिरलो. शान्ती कुटी नावाचा हा भव्य आश्रम! द्वारातून आत कार्यालयाजवळ गेलो. बिछियाँहून निघालो. तब्येत बरी नाही म्हणून बसने आलो असे सांगितले.

दोन जण तिथे बाहेरच उभे होते. बाबाजी वाटत नव्हते. बिछियाँ म्हटल्यावर त्यांना काही अर्थबोध झाला नाही. पण मी सांगितले की उद्या जल अर्पून मला पुढे जायचे आहे, तेवढे त्यांना कळले व त्यांनी हॉलमध्ये आसन लावण्याची अनुज्ञा दिली.

हॉलमध्ये आठ–दहा महिला दिसल्या. शंभर दोनशे माणसे मावतील इतका मोठा हॉल होता. कदाचित हा महिला विभाग असावा समजून पुढे गेलो. पुढे निवासी खोल्या, छोट्या बंगली/कॉटेज वजा होत्या.

हॉल हा एकच आहे हे कुणीतरी सांगितले आणि मला कार्यालयात चौकशीसाठी परत पाठविले. याच हॉलमध्ये थांबा हे ऐकून परतलो. आतमध्ये सॅक उतरविणार तो एकजण बाहेरून आत आला व हा हॉल मी बुक केला आहे, माझे यात्री आहेत इ. सांगायला लागला.

थोडा वाद घालायला लागला, पण निवासाची व्यवस्था झाली पाहिजे तर भोजन करायला या सांगणाऱ्या टूर कण्डक्टरची सारी यथावकाश जेवली. परंतु मी मात्र गेलो नव्हतो. त्यांच्यापैकी एकाने मला निमंत्रण दिले तेव्हा जाऊन मी जेवलो होतो.

प्रातर्विधी मी ५ वाजता उरकला होता. नंतर पाणी गेले. मुख्य गेटही बंद दिसले. मला गोगट्यांना भेटायचे

जेव्हा कुणाला तुमची गरज असते तेव्हा, 'मी आता व्यस्त आहे' हे म्हणणं खूप सोपं असतं.
पण हेच ऐकणं खूप दुःखद वाटतं जेव्हा तुम्हाला कुणाचीतरी गरज असते!

होते. सहा वाजता मी गोगट्यांना भेटायला गेलो ते शेजारच्या (जवळच्या) आश्रमात उतरले होते. गोगटे प्रत्यक्ष आल्यावर वॉचमनने त्यांच्या बरोबर जाण्याची अनुज्ञा दिली. जाधव व बिपिन गुरुजी संत-निवासात होते. गोगटे खोली घेऊन गेले. चार दिवस इथे आहेत.

स्नान झाले नव्हते. परंतु टॉवेल बरोबर होता. खोलीत स्वतंत्र बाथरूम पाहून स्नान उरकून घेतले. चहाही मिळाला. गंमत म्हणजे भेटण्यासाठी बाहेरच्या व्यक्तिला आत येता येत नाही तर गेटवर भेटावे लागते. इतकेच नाही तर बिपिन आणि जाधव यांनाही प्रवेश मिळविताना त्रास झाला. पण भगवे कपडे कामाला आले असे बिपिन म्हणाला.

मैय्या-स्नान करून दक्षिणतटाकडे प्रयाणासाठी निघायच्या तयारीने तिघेही सॅकसह बाहेर पडले. मी ही बरोबर निघालो. पाहिले तर मी उतरलो त्या आश्रमासमोरच मैय्या आहे.

घाटावर बसून मैय्यापूजन केले. माझे स्नान झालेच होते, इतरांनी स्नान केले व सगळे जण पूजेला बसले. धोरणीपणाने मी सकाळी बाहेर पडतानाच शबनममध्ये टॉवेल, मैय्या पूजन प्रतिमा इ. साहित्याबरोबर कॅमेरा वगैरे इतर मौल्यवान वस्तू एकत्र घेतल्या होत्या. आरती/ स्तोत्र याचे पुस्तक मात्र राहून गेले होते. पूजा झाली आणि आरती, स्तोत्र म्हणताना घळघळा अश्रू वाहायला लागले. रडू आवरता आवरेना. समोरच मैय्या होती. संथ! पाणी वाहताना दिसत नव्हते. काल परिक्रमा सोडताना आज असे काही वाटेल आणि असे काही घडेल असे वाटलेच नव्हते. मला सहसा रडू येत नाही. पण आज आता मात्र मी आतून पूर्ण गलबलून गेलो होतो.

पूजा आटोपून उगम कुंडाकडे-मैय्याका बगीचा येथे गेलो. कुठला तरी गुप्त प्रवाह ओलांडला जाऊ नये म्हणून पायवाटेने लांबून तिथे यावे लागते. मी देऊळ दिसल्यावर सरळ कुंडाकडे गेलो. मैय्याला थोडे जल वाहिले. कुपी, कुंडातील जलाने पुन्हा भरले. सूत्र बदलले. इतरांनी रीतसर पूजा केली. दक्षिणा वगैरे ठेवली. यातले मी काहीच केले नाही.

मी असे का वागतो कळत नाही. पण ही वस्तुस्थिती आहे. हे पैसे इ. असे खर्चणे मला (कंजुषपणामुळे) जमतच नाही. जलाचा आणि एक छोटा कॅनही घरी नेण्यासाठी भरून घेतला.

आश्रमात परतलो. इतरजण दक्षिण तटावरून परिक्रमामार्गावर निघून गेले. सकाळी अकरा-साडे अकराच्या सुमारास व्यवस्थापकांना गाठून माझे एक दिवस राहणे आणि वझे दांपत्य पोहोचेल त्यांच्यासाठी जागेची व्यवस्था यासाठी विनंती करत होतो. तेवढ्यात हे दांपत्य आश्रमात पोहोचले.

खरे म्हणजे अशोकने मला फोन केला होता, परंतु मी कपडे धुण्यासाठी गेलो होतो. त्यामुळे कळले नाही. परंतु मला अंदाज होता.

'जेवायची व्यवस्था शेजारी आहे, बाहेर पडून तिथे जा, वेळ झाली असावी' असे व्यवस्थापकाने स्वतःहून सांगितले. परंतु या दोघांचे स्नान, कपडे आटोपेपर्यंत एक वाजून गेला आणि १२ ते १ अशी वेळ असावी समजून आम्ही जेवायला गेलो. तेव्हा दोन वाजायला आले होते. शेजारी भोजन व्यवस्था म्हणजे तो भाग शान्ती कुटीचा नव्हताच. तो होता मृत्युंजय आश्रम. साऱ्यांची तिथे भोजनासह सोय होते. आश्रमाबाहेरील यात्रीची सुद्धा!

भोजनाची वेळ ११ची होती. २ वाजता जेवण कुठून मिळणार? आम्ही म्हटले आम्हाला थोडा उशीर झाला. कल्पना ही की १ची वेळ असावी. वॉचमन म्हणाले थोडा नाही फारच उशीर झाला. परंतु त्याने

---

कधीही खूप जास्ती विश्वास करू नका, खूप जास्ती प्रेम करू नका, खूप जास्ती आशा करू नका;
कारण हे खूप जास्तीच तुम्हाला जास्तीत जास्त दुखवू शकतं.

थांबायला सांगितले. स्वयंपाकघर उघडून पाहिले आणि अन्न शिल्लक आहे हे पाहून आम्हाला आदराने, आग्रहाने संबंधित सेवकाने जेवायला दिले.

दुपारनंतर थोडे हिंडून मैय्याकिनारी जाऊन बसलो. किती शान्त आणि प्रसन्न वाटत होते. संध्याकाळी बाहेर काही खाऊन (साधा डोसा, इडली ३०-२० रु. तर वडा-सांबार ३० रुपये) सात वाजता मृत्युंजय आश्रमात जेवून घेतले.

त्या आश्रमात भिवंडीचा एक सेवेकरी भेटला. कौटुंबिक कलहाने घरून नाहीसा होऊन कुणाच्या तरी सांगण्यावरून गोहाटी येथे एका महन्ताकडे / बाबाकडे गेला. बाबाने त्याला नर्मदा परिक्रमेचा सल्ला दिला व हा त्याच दिवशी निघून सरळ परिक्रमेला आला.

परिक्रमा पुरी करून तो आता इथे सेवेसाठी राहिला आहे. पोलीस तक्रार दाखल आहे. (Missing) परहस्ते घरी खुशाली कळविली आहे. परंतु मोबाईल असूनही घरी संपर्क केलेला नाही.

संघर्ष आईवडिलांशी नाही तर भाऊ-भावजय यांच्याशी आहे. त्याला समजावले आणि किमान संपर्क ठेवायला सांगितले आहे!

**मंगळवार दि. २६ फेब्रुवारी २०१३ दिवस ९३ वा. अमरकंटक-बस-जबलपूर मुक्काम - गेस्ट हाऊस, जबलपूर लष्करी छावणी.**

रात्री उशिरापर्यंत डायरी लिहीत बसलो होतो. आता दिवसांचा हिशेब संपला. कारण परिक्रमा डायरीचा कालचा दिवस अखेरचा. आजपासून नेहमीची डायरी.

सकाळी २ वाजल्यापासून जागा होतो. सकाळी ५.४० च्या बससाठी पाचमिनिटे अगोदरच बसतळ गाठला. बाबा लोकांना भाड्यात कन्सेशन देतो असे कालच ड्रायव्हर, कन्डक्टर सांगत होते. मी पूर्ण पैसे द्यायला तयार होतो तरीही आज २० रु. परत मिळाल्याने मला १८० रु.च भाडे पडले. अमरकंटक ते जबलपूर अंतर २३० कि.मी. आहे. बस छान होती. रुंद २x२ सीट आणि स्लीपर कोच होता. सकाळी ६.०० वाजता निघून बरोबर १४.४५ ला बस जबलपूरला पोहोचली. वाटेत गावोगाव चढणारे-उतरणारे प्रवासी हीच यांची मिळकत असते. २ तास बस रिकामीच धावते. नंतर हळूहळू स्थानिक प्रवासी मिळायला लागतात.

अमरकंटकचा काही भाग दाट जंगलाचा आहे. धुके इतके होते की १०/२० फुटांपलीकडे काही दिसत नव्हते. थंडी तर खूपच होती.

वाटेत पलाश वृक्ष लाल फुलांनी लगडले होते. फुले आहे त्या टोकाला, भागाला पाने नव्हती. त्यामुळे फुलेच फुले दिसत होती. मुरबाडला जाताना फुललेले पलाश दिसतात. पण इतक्या लवकर नाही आणि इतक्या संख्येने नाही. कारण इथे पलाश वृक्षांची संख्या खूपच आहे.

लेफ्टनंट कर्नल साहू यांना सकाळीच बसचा तपशिल SMS द्वारे कळविला होता. अडीच वाजता त्यांच्या ड्रायव्हरचा फोन आला. त्याने सांगितल्या ठिकाणी उतरल्यावर त्याने ओळखून माझे स्वागत केले व पुढल्या दहा-पंधरा मिनिटात मी गेस्ट हाउसमध्ये हजर झालो.

प्रवास चपलांवर केला. बूट टाकून देणार होतो. परंतु OFF MESS वगैरे ठिकाणी चप्पल चालत नाही म्हणून बरोबर घेतले होते.

आल्यावर स्नान आटोपले. अगोदर चहा घेतला होता. स्नानोत्तर रोटी, भाजी, उसळ असे भोजन केले. २ दिवसांसाठी संतोष केसर हा ड्रायव्हर दिमतीला होता.

**- अरविंद ओक**
मानपाडा, डोंबिवली.
भ्रमणध्वनी : ०९८३३४४१५८०

# व्यक्तिवेध-०७ पद्मविभूषण ई. श्रीधरन

*दिल्ली मेट्रो रेल्वे कॉर्पोरेशनचे माजी व्यवस्थापकीय संचालक पद्मविभूषण ई. श्रीधरन यांच्या कारकीर्दीचा आढावा या लेखात घेतला आहे - संपादक*



पद्मविभूषण डॉ. ईलत्तुवलपीळ श्रीधरन व्यवस्थापकीय संचालक, दिल्ली मेट्रो रेल्वे कॉर्पोरेशन. दिल्ली मेट्रोचे जणू बोधचिन्हच असलेल्या श्रीधरन यांचे, व्यासपीठाच्या मंचावरले चित्र, त्यांच्या अवकाशप्राप्तीनंतर, हात जोडून त्यांना अभिवादन करत असतांनाचे, हे प्रकाशचित्र, दिल्ली मेट्रो रेल्वे कॉर्पोरेशनच्या, कॉर्पोरेट कार्यालयात, म्हणजेच मेट्रो भवन येथे ३१-१२-२०११ रोजी काढलेले आहे.

भ्रष्टाचाराचा बोलबाला होत असलेल्या भारतात, शिष्टाचाराचे मूर्तिमंत प्रतीक बनून, विधिवत मिळालेले काम निष्ठापूर्वक करणारे अनेक लोक आजही आहेत. त्यांच्याच बळावर भारतीय समाज व्यवस्था घट्ट उभी आहे.

अशा व्यक्तिंच्या कामांची नोंद घेऊन त्यांचा यथोचित सन्मान आपण करायला हवा. पद्मविभूषण डॉ. ईलत्तुवलपीळ श्रीधरन व्यवस्थापकीय संचालक, दिल्ली मेट्रो रेल्वे कॉर्पोरेशन हे अशा लोकांपैकीच एक आहेत. ३१-१२-२०११ रोजी त्यांनी आपल्या कार्यभाराची सूत्रे, आपल्या उत्तराधिकार्यास सुपूर्त केली. त्यानिमिताने, त्यांच्या कारकीर्दीचा घेतलेला हा एक आढावा. कोकण रेल्वेचे दैदिप्यमान काम ज्यांनी संकल्पिले, नियोजले आणि नियत कालावधीत यशस्वीरीत्या करून दाखवले त्या श्रीधरन यांना माझा मानाचा मुजरा!




आज वाशी स्टेशनकडे देशातल्या आदर्श स्टेशनचा नमुना म्हणून पाहिले जाते. गाड्या, फलाट, इमारत, रूळमार्ग पार करणारे दादरे, सगळेच एका छताखाली आणल्याने, स्टेशन आहे की विमानतळ असे वाटणारे भारतातले पहिले रेल्वे स्टेशन आहे वाशी. भारतभरच्या स्टेशनांभोवतीच्या बकाल वस्तीचा येथे निकास करून, आंतरराष्ट्रीय माहिती-तंत्र-उद्यानाची निर्मिती स्टेशनच्या वरच केल्याने साऱ्या परिसराचेच उद्धरण केलेले स्पष्टपणे जाणवते. कोकण रेल्वे प्रकल्पाला अशीच विकासाची दिव्य दृष्टी देणारे श्रीधरन आज कार्यनिवृत्त झालेले आहेत. त्यांच्याच उत्तम कार्याची ही उजळणी.

माणूस आपल्या कर्तृत्वाने मोठा बनतो जन्माने नव्हे.

श्रीधरन यांचा जन्म १२ जून १९३२ रोजी केरळातील पलक्कड जिल्ह्यातील करुकपुथूरमध्ये झाला. बसेल-ईव्हांजेलिकल-मिशन-उच्च-माध्यमिक शाळेतून त्यांनी शिक्षण घेतले. पलक्कडच्या व्हिक्टोरिया कॉलेजातून महाविद्यालयीन शिक्षण घेतले आणि मग काकीनाडा येथील गव्हर्नमेंट इंजिनिअरिंग कॉलेजमधून अभियांत्रिकी स्नातक झाले. कोझिकोडे येथील गव्हर्नमेंट पॉलिटेक्निकमध्ये नागरी-अभियांत्रिकीतील व्याख्याता म्हणून काम केले. नंतर मुंबईच्या पोर्ट ट्रस्टमध्ये उमेदवारी केली. त्यानंतर ते भारतीय रेल्वेत रुजू झाले. दक्षिण रेल्वेत ते १९५४ च्या डिसेंबरमध्ये, सहाय्यक प्रशिक्षणार्थी अभियंता म्हणून रुजू झाले.

दक्षिण आणि दक्षिणपूर्व रेल्वेत त्यांनी सहाय्यक अभियंता, कार्यकारी अभियंता, प्रभागीय अभियंता आणि उपमुख्य अभियंता इत्यादी पदे भूषवली. जेव्हा ते नवे मार्ग निर्माण करण्याची जबाबदारी सांभाळत होते, तेव्हा क्विलॉन-एर्नाकुलम मिटरगेज आणि मँगलोर-हसन मार्गांची निर्मिती करण्यात आली. त्यादरम्यान अनेक पूल, बोगदे यांचे प्रकल्प यशस्वीरीत्या पार पडले. तसेच पालघाट, हुबळी आणि बेझवाडा प्रभागांची देखरेखही केली गेली.



१९६३ मध्ये भारताच्या रामेश्वरमला मुख्य भूमीशी जोडणारा तामिळनाडूतील पंबनम्-पूल वादळाने वाहून गेला. पंबनम्-पूलाचे वाहून गेलेले १२५ टप्पे, ४६ दिवसात पुन्हा उभे करण्याच्या त्यांच्या कामगिरीखातर रेल्वे मंत्रालयाने त्यांना पारितोषिक दिले. ते उपमुख्य अभियंता असताना देशातील पहिली मेट्रो रेल्वे १९७० ते १९७५ या काळात कोलकाता येथे उभारण्यात आली. त्या कामाचे तेच प्रभारी होते. त्यांनीच ह्या कामाचा तपास, नियोजन आणि अभिकल्पन केले होते.

ऑक्टोबर १९७९ ते नोव्हेंबर १९८० ते जहाज वाहतूक मंत्रालयाच्या कोचीन येथील जहाजबांधणी कारखान्याचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक म्हणून प्रतिनियुक्तीवर होते. त्यांच्या कार्यकाळात या कारखान्याने उभारलेले पहिले जहाज राणी पद्मिनीचे जलावतरण करण्यात आलेले होते.

जुलै १९८७ मध्ये ते पश्चिम रेल्वेचे प्रमुख व्यवस्थापक झाले. जुलै १९८९ मध्ये रेल्वे महामंडळाचे अभियांत्रिकी सदस्य व म्हणूनच भारत सरकारचे पदसिद्ध सचिव झाले. १९९० मध्ये अवकाशप्राप्त करतानाच ते प्रतिष्ठेच्या समजल्या गेलेल्या कोकण रेल्वेवर अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक म्हणून नियुक्त केले गेले. कोकण रेल्वेचा प्रकल्प यशस्वीरीत्या पूर्ण केल्यावर ५ नोव्हेंबर १९९७ पासून ते दिल्ली मेट्रो रेल्वे कॉर्पोरेशनचे व्यवस्थापकीय संचालक म्हणून नियुक्त केले गेले.



(पृष्ठ क्र. १४ वर)

# डॉ. वा. ना. बेडेकर जन्मशताब्दीनिमित्त

*डॉ. वा. ना. बेडेकर यांचे हे जन्मशताब्दी वर्ष. डॉक्टरांच्या महान कार्याचा संक्षिप्त आढावा या लेखात लेखिकेने घेतला आहे - संपादक*

**शतेषु जायते शूरः**
**सहस्त्रेषु च पण्डितः।**
**वक्ता दशसहस्त्रेषु**
**दाता भवति वा न वा।।**

शूर, पंडित, वक्ते मिळणं कठीणच. पण ते मिळून जातात. पण दातृत्व असणारा माणूस मिळणं कठीण!

असा विलक्षण 'देता' हात असणारे आपणा सर्वांचे आधारस्तंभ, विद्येचे उपासक आणि प्रचारक आदरणीय डॉ. वा. ना. बेडेकर यांचं हे जन्मशताब्दी वर्ष. आज त्यांच्याबद्दल वाटणाऱ्या आदराची ही पोचपावती.

२० फेब्रुवारी १९१७ साली महाशिवरात्रीच्या दिवशी जन्मलेल्या डॉक्टरांनी त्या महादेवाप्रमाणेच खरोखर व्रतस्त जीवन अंगीकारले. पुरोगामी विचारसरणीच्या, देशभक्त, सूर्योपासक पित्याचे छत्र त्यांच्या १० व्या वर्षीच हरवले आणि त्या भरलेल्या कुटुंबातून हे कुटुंब कोकणात आपल्याच घरात आपल्या माणसात सामावले.

खेडेगावातील मामांचा कारखाना पाहून लहानपणीच त्यांनी ठरवले की मोठेपणी मोठे कारखानदार व्हायचे. तद्वत पुढे खरोखरी मोठे झाल्यावर त्यांनी 'यू फार्मा' नावाच्या औषध कंपनीची स्थापनाही केली पण अल्पावधीतच ती बंद पडली. सुखाने हुरळून जाऊन दुःखाने कोलमडून पडणं त्यांच्या स्वभावातच नव्हतं म्हणूनच यांत्रिक कारखानदार न होता ते मानवी यंत्रांचे मात्र इंजिनियर झाले आणि त्यावेळी त्यांनी घेतलेला निर्णय योग्य होता हे भविष्यात सप्रमाण सिद्धही केलं. अशाप्रकारे खऱ्या अर्थाने त्यांची इच्छापूर्ती म्हणजे इच्छा ते पूर्ती असा व्यावसायिक प्रवास झाला. असे हे सेल्फमेड व्यक्तिमत्त्व!

वडिलांचा अकाली मृत्यू, हेडमास्तरांचे बारिक लक्ष, शिक्षणासाठी कोकणात रवानगी, शिक्षणासाठी केलेली धडपड, अर्धवेळ नोकरी करून चालू ठेवलेले विद्यार्जन, क्वचित प्रसंगी झालेली उपासमार, अशा अडचणींवर मात करीत दारिद्र्याशी टक्कर देत आवड असलेला वैद्यकीय व्यवसाय करताना, मनाला भावलेले समाजकार्य करण्यात डॉक्टरांनी आनंद मिळवला.

आज ज्या कळसापर्यंत आपण येऊन पोहचलोय तेथून खालील चिरेबंदी पायाची कल्पना आपल्याला कधीच करता येणार नाही. आज भक्कम पायावर दिमाखात उभ्या असलेल्या वि. प्र. मं. ची सुरवात गोठ्यात वर्ग भरण्यापासून झाली. यावर कदाचित आपला विश्वासच बसणार नाही. पण १९५७ सालापासून डॉक्टरांच्या अध्यक्षतेखाली अल्पावधीतच मंडळाने गोठ्यापासून ते थोरले बाजीराव सभागृहापर्यंत मजल मारली आणि ही घोडदौड माहिती तंत्रज्ञान क्षेत्रापर्यंत जाऊन पोहोचली. सर्व नव्या व आव्हानात्मक क्षेत्रामध्ये मंडळाने ठसा उमटवून जणू काही 'जे जे नवे ते ते हवे' असा उत्तमतेचा विडाच उचलला. वाईट अनुभवांना मागे टाकीत, चांगल्या अनुभवांची उजळणी करीत संस्थेचा हा संसार निस्पृह हेतूने करणारे डॉक्टर आपल्या पिढीचे आदर्श ठरले आणि वि.प्र. मं.च्या इतिहासातील सुवर्णकाळ साऱ्यांनी अनुभवला.

---

कधीही कुठल्याही गोष्टीमधून खूप जास्ती आशा करू नका; कारण जितकी जास्ती तुम्ही आशा कराल तितकी जास्ती निराशा पदरी पडेल.

डॉक्टरांच्या अध्यक्षतेखाली वि. प्र. मं. चे काम निव्वळ शिक्षणाच्या वाढीचे नव्हते तर प्रसंगी घातक प्रवृत्तींना आळा घालणारे, कसलाही मुलाहिजा न ठेवता अपप्रवृत्तींना धरबंध घालणारे असे होते. त्याचवेळी विद्यार्थ्यांना महाविद्यालयीन शिक्षणासाठी मुंबईला जावे लागत आहे ही अडचण लक्षात घेऊन वि. प्र. मं. ने ठाण्यात सर्वप्रथम महाविद्यालयांची निर्मिती केली. या श्रेयासोबतच या महाविद्यालयांनी ठाण्याचा शैक्षणिक चेहरा अशी ओळख निर्माण केली.

स्वतःचा दवाखाना, हॉस्पिटल, शाळा, कॉलेज, बँक या सर्व आघाड्यांमध्ये दिवसाचे २४ तासही त्यांना कमी पडत. म्हणूनच कदाचित म्हणत असावेत की, कामसू माणसाचा दिवसच मुळी २६ तासांचा असतो.

'सुंदर ते हात ज्यांना निर्मितीचे डोहाळे' या बोरकरांच्या काव्यपंक्तीप्रमाणे डॉक्टरांच्या अस्वस्थ मनाने स्वस्थ न बसता माणसं जगवली, झाडं जगवली, संस्था जगवल्या, ध्येयासाठी उभी हयात अविश्रांत झटण्यात खर्ची घातली. पण ठाण्यात मेडिकल कॉलेज काढू शकत नाही ही रुखरुख मात्र त्यांना कायम राहिली. त्यांच्या कार्याचा उल्लेख करताना म्हणावंसं वाटतं – अथक परिश्रमाने शैक्षणिक संस्थांच्या उभारणीत सिंहाचा वाटा धारण करणारे शिक्षण महर्षी, ज्ञानसंपन्न, अनुभव संपन्न, कृतिशील, श्रमाचा पुरस्कार करणारे व्यक्तिमत्त्व ज्यांनी शेवटपर्यंत हातांना राबत ठेवलं.

'बोले तैसा चाले, तयाची वंदावी पाऊले' असे सदैव कामात, धांदलीत लगबगीने चालणारे डॉक्टर, दैवाला बोल न देता प्रयत्नांची पूजा करणारे खरे रुग्णमित्र, विज्ञान प्रेमी, निसर्ग प्रेमी, द्रष्टे डॉक्टर!

Low aim is crime असे त्यांना वाटे. आपल्या भाषणात विद्यार्थ्यांना ते नेहमी संदेश देत –''विद्यार्थ्यांनो उदात्त स्वप्ने पाहा, ती सत्यात उतरवण्यासाठी प्रयत्न करा. बलोपासना करा, मन आणि मनगट भक्कम ठेवा व देशसेवेसाठी कटीबद्ध व्हा.''

त्यांच्या स्वभावातील नितळ साधेपणा व शिक्षण विषयक तळमळ पाहून समाज त्यांना 'जीवनगौरव' पुरस्काराने सन्मानित करतो. त्यांचं नेमकंच बोलणं उदात्ततेचा आणि उत्तमतेचा ध्यास घेणारं अगदी सुभाषिताप्रमाणे मनावर बिंबत राहीलं.

रुग्णांशी अगदी एकरूप होणारे, अनेक संस्थांना जन्म देणारे, संघर्षावस्थेत विवेक बुद्धिने निर्णय घेणारे, प्रवासाचा आणि वाचनाचा छंद जोपासणारे, मराठी माध्यमाचा जाहीर सभांतून पुरस्कार करणारे, शास्त्रीय गाणं व शास्त्रीय वादन संगीताची आवड जोपासणारे, संस्थेचे पितामह ८८ वर्षांचे निरोगी आयुष्य जगले.

पण या यशाचं सर्वांचे श्रेय डॉक्टरांनी स्वतःकडे कधीच घेतले नाही. 'इदं न मम्' म्हणत सर्व श्रेय कै. गुणाकर जोशी, कै. मा. ना. पाटील, कै. रा. कृ. गोखले, ल. ग. देव, कै. करंदीकर, कै. प्राचार्य म. द. नाडकर्णी या सर्व ध्येयाने प्रेरीत झालेल्या आपल्या सहकाऱ्यांना दिले.

आपल्या स्मृतीलहरी या आत्मचरित्रात जीवन विषयक दृष्टीकोन सांगताना डॉक्टर म्हणतात –

''ओंजळीतील फुलं सुगंधीत राहावीत! समाजाला या फुलांनी सुगंध देत देतच तृप्त मनानं केव्हातरी अलगद निरोप द्यावा.''

खरं तरं डॉक्टरांसारख्या लोकोत्तर व्यक्तिंना मर्त्य मानवाच्या जन्म आणि मृत्यूचे नियम लागू पडतच नाहीत. कारण आपल्या अलौकिक कार्याने ते सतत आपल्या सर्वांच्या मनात स्पंदत राहतात.

म्हणूनच या शिक्षण महर्षींना वंदन करताना शेवटी म्हणावंसं वाटतं –

---

योग्य वेळेची प्रतीक्षा करीत बसण्यापेक्षा हाती असलेल्या वेळेलाच योग्य बनवा.

**नाही त्यांनी सोसल्याचा हिशेब मांडला**
**आपल्याच साठी चांदण्याचा चुरा हा सांडला...**

शेवटी त्यांच्याच शब्दात त्यांचा आशावाद –

**नवमानव, नवनागरिक, प्रयत्नी इथे घडतसे**
**सत्य, शिव, सुंदर जयांचे अणुरेणी वसे.**
**बालके तव शिशुमंदिरी दाखल होता**
**विद्यामंदिरी दौड तयाची न रोखितां**
**नवयुवक हा प्रवेशिता विद्येचे महाद्वार**
**स्वप्न आमुचे तयाभोवती होई साकार**
**नवयुवक हा भारतभूचा सुपुत्र व्हावा,**
**बुद्धी जयाची, शक्ती जयाची, भारत भू चा ठेवा.**

**– सौ. साधना जोशी**
डॉ. बेडेकर विद्यामंदिर,
ठाणे.

•••

## दिशासाठी

**आपले लेखनसहकार्य अपेक्षित आहे. आपल्या अध्ययन–अध्यापन विषयांतील नवीन घडामोडी, नवीन ज्ञानक्षेत्रे याबाबत सातत्याने लेखन करणे हे अध्यापनात साहाय्यकारी ठरणारे आहे.**

**तरी आपणांकडून लेखन अपेक्षित करीत आहोत.**

**– संपादक**

(पृष्ठ क्र.११वरून **व्यक्तिवेध–०७ पद्मविभूषण ई. श्रीधरन**)

कोकण रेल्वे आणि मग दिल्ली मेट्रो यांच्या उभारणीत अथक परिश्रम करून भारतीय सार्वजनिक वाहतूकीचे चित्रच त्यांनी बदलवून टाकले. त्यांच्या निष्ठापूर्वक केलेल्या कठोर परिश्रमाचे फळ म्हणून भारत सरकारने २००१ मध्ये त्यांचा पद्मश्री देऊन सन्मान केला. टाईम्स ऑफ इंडियाने त्यांना २००२ साली मॅन ऑफ द ईयर म्हणून निवडले. २००३ साली टाईम नियतकालिकाने त्यांची आशियातील एक पुढारी म्हणून निवड केली. २००५ मध्ये फ्रेंच सरकारनेही त्यांचा गौरव केला.

२००९ मध्ये त्यांच्या विज्ञान आणि तंत्रज्ञानातील भरीव कामगिरीच्या सन्मानार्थ त्यांना भारत सरकारने पद्मविभूषण सन्मान देऊन गौरवले आहे.

(श्रेयनिर्देशः प्रकाशचित्रे व मजकूर यांखातर खाली दिलेल्या संबंधित संस्थळांचे मनःपूर्वक आभार.)

**संदर्भः**

१. १९५४ ते २०१४ सालांदरम्यानचे पद्म पुरस्कार http://www.mha.nic.in/sites/upload_files/mha/filesYearWiseListOfRecipientsBharatRatnaPadma-wards-1954-2014.pdf

२. दिल्ली मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेडचे अधिकृत संकेतस्थळ http://www.delhimetrorail.com what new_ details.aspx?id=NgRPa7TMhkQlld&rdct=d

3. विकिपेडियावरील श्रीधरन ह्यांची माहिती http://en.wikipedia.org/wiki/E._Sreedharan

४. पद्मविभूषण ई. श्रीधरन यांस मानाचा मुजरा http://nvgole.blogspot.in/2012/01/blog post.html#links

**– नरेंद्र गोळे**
१०४ दत्तात्रय प्रसन्न, जोशीवाडी,
टिळकपथ छेदगल्ली, टिळकनगर,
डोंबिवली (पू.) – ४२१२०१
भ्रमणध्वनी : ९९३०५०१३३५
Email : narendra.v.gole@gmail.com

जीवन म्हणजे जन्म आणि मृत्यू मधलं लहानसं अंतर, एवढाशा काळात आनंदी राहा आणि दुसऱ्यांना आनंदी ठेवा. आयुष्याचा प्रत्येक क्षण आनंदाने उपभोगा.

# ओळख वनस्पतींची
# गुलाबी तिळवण

*'ओळख वनस्पतींची' या लेखमालेतील सोळावा भाग. 'गुलाबी तिळवण' या वनस्पतीची वैशिष्ट्ये, त्याचे उपयोग, त्याची देखभाल या बाबींवर या लेखात प्रकाश टाकला आहे - संपादक*

मित्रांनो, प्रत्येक वनस्पती स्वतःचे काही वैशिष्ट्य राखून असते. त्यामुळे इतरांपासून वेगळी म्हणून लक्षात राहते. बहुतेक वनस्पती हिरव्या रंगात वटलेल्या असतानाही प्रत्येकीचा हिरवा रंग वेगळा. शिवाय विविध ऋतूंनुसार त्यात होणारा बदल वेगळा. फुलांचेही तसेच आहे. प्रत्येकाचे नुसते रंगच वेगळे नसतात तर प्रत्येकाची रचना वेगळी, आकार वेगळे, फुलण्याची वेळ व पद्धत वेगळी व गंधही वेगळे. काहींना तर गंधच नसतो. ती उणीव ही फुले आपल्या विशिष्ट रंगाने भरून काढतात. काहींना तर चक्क दुर्गंध असतो. राजगड किल्ल्याच्या परिसरात फिरताना अशाच एका आगळ्या-वेगळ्या रचनेच्या गुलाबी फुलांनी माझे लक्ष वेधून घेतले. छोटे छोटे गुलाबी चमचे (टी स्पून) त्यांच्या दांडीच्या बाजूने जवळ जवळ रचून ठेवावे म्हणजे अशी उचना दिसेल तसे. बरे, चारच गुलाबी नाजूक पाकळ्या; पण त्या सर्व एका बाजूला अन् दुसऱ्या बाजूला लांबच लांब व लांब पिवळ्या टोप्या घातलेले पुंकेसर. हा सर्व पसारा एका बारीक दांडीवर (देठावर) तोललेला; जसे अनेक फुलांची गर्दी असलेले व खालून वर असे निमूळते होत गेलेले तुर्रे. या तुऱ्याच्या शीर्षस्थानी बारीक बारीक लांब देठावर विराजमान झालेल्या लांबोळक्या गुलाबी कळ्या. एका नाजूक, सरळ, हिरव्या रंगाच्या फांदीवर तोलून धरलेला हा पसारा. त्यांच्या गुलाबी रंगाला उठाव देण्यासाठी एकमेकांच्या विरूद्ध असलेली बदामाकृती लहान लहान हिरवी पाने.



अशी ही विलोभनीय रचना आहे गुलाबी तिळवणाची. तिळवण पांढऱ्या व पिवळ्या रंगातही आढळतो. त्यातही प्रत्येकाच्या रचनेत थोडा थोडा फरक आहेच. प्रत्येक रंगाच्या फुलझाडांची शास्त्रीय नावेही वेगळी आहे. पण आहेत मात्र Cleomaceae कुटुंबातीलच. गुलाबी तिळवणाचे शास्त्रीय नाव आहे Cleome spinosa (CLE OME SPINOSA). तिळवणला Spider flower या इंग्रजी नावाने ओळखतात; याची पाने पंजाच्या आकाराची पण सहा ते सात पर्णदाने असलेली. एकाच ठिकाणाहून निघालेली व सर्व दिशांनी पसरलेली अंडाकृती टोकेरी व दंतूर पाने बारीक लव असलेली व उग्र वासाची असतात. ६० सें.मी. ते १ मीटर पर्यंत उंची असणारे हे झाड पडीक जागी, शेताच्या कडेला किंवा जंगलातील मोकळ्या जागी आढळते. या झाडाचे आयुष्य जेमतेम एक वर्षाचं. पावसाळ्याच्या आगमनासोबत रुजून येते.

---

कुठलीही गोष्ट कायमस्वरूपी नसते. परिस्थिती कितीही वाईट असली तरी स्वतःला खूप जास्ती त्रास करून घेऊ नका. ती नक्कीच बदलेल.

फुलण्याचा काळ जुलैपासून अगदी नोव्हेंबर डिसेंबरपर्यंत. अर्थात हे जमिनीतील ओलाव्यावर अवलंबून आहे. या झाडाचे दुसरे वैशिष्ट्य म्हणजे सरळ उंच वाढत जाणाऱ्या फांदीवर आलेले फुलांचे तुरे वर वर वाढत जाताना प्रथम लांब बारीक देठावरील पाकळ्या गळून पडतात व लांब पुंकेसर तेवढे शिल्लक राहतात. पुंकेसराची जागा घेते एक हिरव्या रंगाची लांब शेंग, लांब बारीक दांडीवर आलेल्या व चारही बाजूंनी आडव्या पसरलेल्या लांब बारीक हिरव्या शेंगा. असे मोठ्या बॉटल ब्रशसारखे हे तुरे दिसतात. अन् जोडीला हिरव्या पानांनी (पर्णिकांनी) फांदी पूर्ण झाकलेली म्हणजे हिरव्या आवरणात सजविलेला पुष्पगुच्छच जणू. एकाच झाडावरील मुख्य पाने व या पुष्प दंडावरील पाने यांच्या रचनेत किती तफावत.

तिळवणची झाडे महाराष्ट्र व गुजरात याच भागात आढळतात. या झाडाचे मूळ, पाने व बीया औषधोपयोगी आहेत. मूळांचा उपयोग वातविकार, जलोदर, व्रण, कानदुखी, प्लिहावृद्धी आणि कफ यात करतात. या झाडाला कानफुटी या नावाने देखील ओळखतात. ते याच्या कानावर होणाऱ्या औषधोपचारामुळे असावे. या झाडाच्या बीया कृमीनाशक आहेत. या बीयांपासून काढलेले तेल देखील विविध दुखण्यांवर वापरतात. अर्थात वनस्पतीचा औषध म्हणून वापर करताना तज्ज्ञांचा सल्ला घेणे आवश्यक आहे.

अशी ही उपयुक्त वनस्पती हल्ली शेतांमधूनही फार कमी प्रमाणात दिसते. हल्ली पडीक जमिनीचा शेतीसाठी होऊ घातलेला वापर किंवा शहरीकरण व औद्योगिकरण यामुळे या वनस्पतीवर आघात होत आहेत. औषधी वनस्पती म्हणून याची मुद्दाम लागवड केल्याचे अजून तरी माझ्या पाहण्यात आले नाही. याच्या पांढऱ्या, पिवळ्या या प्रकारांनुसारही याचे औषधी गुणधर्म देखील काही प्रमाणात वेगळे आहेत. अर्थात यातील तज्ज्ञच ते नेमके सांगू शकतील. काहीही असो; एक वैशिष्ट्यपूर्ण झाड म्हणून याचे महत्त्व नक्कीच आहे. वृक्षवल्लीवर प्रेम करणाऱ्यांसाठी व त्यांचा आस्वाद घेणाऱ्यांसाठी निसर्गाची ही वेगळी देणगी आहे.

**– प्रकाश दुधाळकर**
एफ–२२, नीता अपार्टमेंट,
मिठागर–नवघर लिंक रोड,
मुलुंड (पू.), मुंबई – ८१.
दूरध्वनी : २१६३ ६०५२

●●●

---

(पृष्ठ क्र.५ वरून... **सिंगापूरचे राष्ट्रीय ग्रंथालय**)

लेखी स्वरूपात असलेले ज्ञान हे प्रत्येक संस्कृतीचे व्यवच्छेदक लक्षण आहे. प्रगत समाज हे ज्ञान ग्रंथालयाच्या स्वरूपात सुरक्षित ठेवण्यासाठी प्रयत्न करीत असते. इंग्लंडमध्ये अशी ग्रंथसंपदा सर्वत्र दिसते. सिंगापूरच्या ग्रंथसंपदेमागे एका इंग्रज माणसाचीच दूरदृष्टी आहे. त्याचे नाव सर स्टॅम्फर्ड रॅफेल असे आहे. त्याने पुढाकार घेऊन १८८७ मध्ये एका लहानशा वाचनालयाची सुरुवात केली. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर सिंगापूरच्या लोकांनी ती परंपरा कायम ठेवली. त्यासाठी एक प्रशस्त अशी इमारत बांधली, ग्रंथ संपदेत भर घातली आणि त्याची पद्धतशीर रचना करून ठेवली. म्हणूनच ते पर्यटकांसाठी एवढ्या अभिमानाने ग्रंथालय सफर आयोजित करू शकतात. त्यांच्या ज्ञानलालसेला शतशः प्रणाम.

**- डॉ. सुधाकर आगरकर**
सी–१४, विसावा, वैभवनगरी,
कल्याण–शीळ रोड,
काटई, ता. कल्याण,
जि. ठाणे – ४२१२०४

●●●

---

जर तुम्ही थांबून भुंकणाऱ्या प्रत्येक कुत्र्यांना दगड मारीत राहिले तर तुम्ही तुमच्या नियोजित ठिकाणावरती कधीही पोहोचू शकणार नाही!

# नक्षलवाद व भारत

*भारतातील नक्षलवादाच्या समस्येचा ऊहापोह करणारा लेख - संपादक*

सुरक्षिततेच्या दृष्टीने भारताला ग्रासलेल्या अनेक समस्यांपैकी नक्षलवादाची समस्या ही एक होय. आपण जेव्हा भारताच्या सुरक्षितेबाबत चर्चा करतो तेव्हा आपल्या नजरेसमोर भारताला बाह्य शक्तींपासून संभावणारा धोका व आक्रमण हेच असते. ह्यात प्रामुख्याने परकीय भूमीतून होणारे अतिरेकी हल्ले व पाकिस्तान व चीन ह्यांसारख्या शेजारी राष्ट्रांकडून होऊ शकणारे संभाव्य आक्रमण याचा समावेश होतो. आपली प्रसार माध्यमे, मुख्यतः वृत्तपत्रे व वृत्तवाहिन्यादेखील ह्याचीच जास्त दखल घेताना दिसतात. मात्र, आपण जर सुजाण नागरिक असू व आपल्या देशाच्या सुरक्षिततेच्या व प्रामुख्याने अंतर्गत सुरक्षिततेच्या दृष्टीने विचार केला तर लक्षात येते की, 'नक्षलवाद' हा आपल्या दृष्टीने मोठा धोका आहे.

भारतातील बराच मोठा भाग नक्षलग्रस्त आहे. हा भूभाग दक्षिण भारतातील आंध्र प्रदेश व तेलंगण ह्या राज्यांपासून सुरू होतो. येथून हा भाग वा नक्षलग्रस्त पट्टा महाराष्ट्रातील गडचिरोली जिल्हा तसेच छत्तीसगढ, ओडिशा(ओरिसा), झारखंड, पश्चिम बंगाल, बिहार ह्या भारतीय राज्यांतून थेट नेपाळपर्यंत जातो. नेपाळमध्ये देखील नक्षलवादी चळवळ सक्रीय आहे. नेपाळमधील ह्या चळवळीचे नेतृत्त्व श्री पुष्प कमल दहल ऊर्फ 'प्रचंड' हे करताना आढळतात. प्रचंड हे १८ ऑगस्ट २००८ ते २५ मे २००९ ह्या कालावधीत नेपाळचे पंतप्रधान होते. सध्या ते नेपाळचे विद्यमान पंतप्रधान असून त्यांनी ही पंतप्रधानपदाची धुरा ऑगस्ट २०१६ मध्ये दुसऱ्यांदा स्वीकारली आहे. त्यामुळे सध्या नेपाळमधील नक्षलवादी चळवळ थंडावलेली आहे असे जाणकारांचे मत आहे.

त्यामुळेच भारतातील काही कट्टरवादी नक्षलवादी त्यांच्या नेपाळमधील नक्षलवादी बांधवांवर काहीशा प्रमाणात नाराज आहेत असे काही जनांचे मत आहे. याचे कारण म्हणजे नक्षलवादी चळवळीचे प्रेरणास्थान साम्यवादी चीनचे एकेकाळचे दिवंगत अध्यक्ष माओ-झे-दंग हे आहेत. ह्याच माओ-झे-दंग यांच्या नेतृत्वाखाली चीनमध्ये १९४९ साली साम्यवादी क्रांती झाली होती. १९४९ ते १९७६ सालापर्यंत ते साम्यवादी चीनचे अध्यक्ष होते. माओंचे असे मत होते की, राष्ट्रामध्ये सततपणे क्रांत्या होणे आवश्यक असते. कारण एका विशिष्ट कालावधीनंतर देशातील व्यवस्थेला, प्रशासनाला व जनतेला एक प्रकारची मरगळ येते व त्यांच्यावर गंज चढतो. त्यामुळेच ह्या सर्वांना कायम कार्यक्षम व उत्तेजित ठेवण्यासाठी एका विशिष्ट कालावधीनंतर क्रांती झालीच पाहिजे. त्याचप्रमाणे क्रांती वा पूर्ण क्रांती म्हणजेच देशाच्या प्रगतीचे गमक होय असे त्यांचे मत होते. त्यामुळे खुद्द माओंनी १९४९ नंतर म्हणजेच साम्यवादी क्रांतीनंतर उत्तुंग आर्थिक झेप, शंभर फुले उमलू द्या व सांस्कृतिक क्रांतीसारख्या चळवळी चालविल्या. ह्या सर्व चळवळींच्या सहाय्याने त्यांनी आपल्या मताशी सहमत नसणाऱ्या व्यक्तिंचा काटा तर काढलाच मात्र सोबतच सर्व जनतेला व प्रशासनाला कधीच खऱ्या अर्थाने स्थीर होऊ दिले नाही. सांस्कृतिक क्रांतीच्या दरम्यान तर शहरी मध्यमवर्गातील पेशाने डॉक्टर, इंजिनियर, प्राध्यापक, लेखक, वकील असणाऱ्या इत्यादी बुद्धिजीवी लोकांना त्यांनी सक्तीने ग्रामीण भागात पाठविले व त्यांना अनवाणी पायांनी शेतीवर काम करण्यास भाग पाडले. एवढेच नव्हे तर अगदी शहरातील विद्यार्थ्यांना देखील गावाकडे जाऊन श्रमदान करण्यास भाग पाडले. माओंनंतर साम्यवादी चीनचे अध्यक्ष बनलेले व आपल्या

उदारमतवादी आर्थिक धोरणांनी चीनचा कायापालट करून सध्याच्या चीनची खऱ्या अर्थाने मुहूर्तमेढ रोवणारे म्हणजेच सध्याचा अत्याधुनिक व आर्थिक दृष्ट्या प्रबळ चीन बनविण्यास आपल्या धोरणांनी कारणीभूत ठरणारे देंग-झाव-पिंग यांनादेखील माओंनी सांस्कृतिक क्रांतीच्या काळात अतिशय वाईट व भयानक वागणूक दिली होती. असो. तर अशा ह्या कडवट नेत्याला आपली प्रेरणा मानणाऱ्या कट्टर नक्षलवाद्यांना लोकशाही व्यवस्थेपुढे व सरकारपुढे झुकते घेणे मान्य नाही. किंबहुना त्यांचे ध्येयच लोकशाही विरूद्ध बंड करून (यात भारत व नेपाळ ह्या दोन्ही देशांमधील लोकशाही अभिप्रेत आहे) माओवादी व साम्यवादी व्यवस्था निर्माण करून आपली ध्येय धोरणे राबविणे हे आहे. त्यामुळेच 'प्रचंड' ह्यांनी नेपाळमध्ये लोकशाही मार्गाने सत्तेत सहभागी होणे हे काही नक्षलवादी नेत्यांना खचितच पसंत नाही.

आपण जर नक्षलवादी चळवळीचा इतिहास पाहिला तर असे लक्षात येते की, ह्या चळवळीची सुरुवात पश्चिम बंगाल ह्या राज्यातील उत्तरेकडील दार्जिलिंग ह्या जिल्ह्यातील 'नक्षलबाडी' ह्या गावातील एका घटनेतून झाली. आपण बंगालचा इतिहास पाहिला तर असे लक्षात येते की, येथे मध्ययुगीन तसेच आधुनिक काळाच्या सुरुवातीनंतर १९ व्या शतकात तसेच २० व्या शतकाच्या पूर्वार्धात कृषीक्षेत्रात जमीनदारांचे प्राबल्य होते. ह्या राज्यातील बरीचशी शेतजमीन जमीनदारांच्या ताब्यात होती व त्या जमीनीवर शेतमजूर काम करत असत. हे शेतमजूर अनेकदा समाजातील खालच्या स्तरातील म्हणजेच खालच्या जातीतील व आदिवासी जमातीचे असत. ह्या शेत मजूरांची नेहमी एक तक्रार असे की, जमीनदार त्यांचे शोषण करतात. सुगीच्या काळात कृषी उत्पन्नातील बराचसा भाग जमीनदार घेत. काही डाव्या विचारसरणीच्या लोकांच्या मते तर जमीनदार पोटापुरते धान्य देखील शेतमजूरांसाठी वा जमीनदारांची जमीन कसणाऱ्यांसाठी ठेवत नसत. बऱ्याच अंशी ह्या प्रकारची स्थिती त्याकाळात व छुप्यारितीने आजही भारताच्या इतर काही राज्यांतही असलेली आपणास आढळते. यात अगोदर नमूद केल्याप्रमाणे सध्याचा तेलंगण, आंध्र प्रदेश, ओडिशा, छत्तीसगढ, झारखंड, बंगाल, बिहार इत्यादी राज्यांचा समावेश होते.

ह्याच जमीनदार व शेतमजूर यांच्यातील तंट्यांमुळे वा धुसफुसीमुळे बंगालमधील 'नक्षलबाडी' ह्या गावात २५ मे १९६७ रोजी एक घटना घडली व ह्या घटनेने भारतातील नक्षलवादाच्या समस्येला जन्म घातला. ही घटना कोणती होती? तर घटनेचा तपशील असा होता की, एका आदिवासी तरुणाकडे आपली जमीन कसण्याचा न्यायालयीन आदेश होता. मात्र तेथील स्थानिक जमीनदाराच्या गावगुंडांनी ह्या तरुणावर हल्ला केला. त्यामुळे आदिवासींनी ह्याला प्रत्युत्तर म्हणून जमीनदाराला त्याचा हिस्सा देण्यास नकार दिला. एवढेच नव्हे, तर जमीनदाराच्या धान्याच्या कोठारातून सर्व धान्य उचलले. ह्या घटनेनेच भारतातील नक्षलवादाची सुरुवात झाली. ह्या चळवळीला तत्कालीन कम्युनिस्ट पार्टी (मार्क्सिस्ट) ह्या बंगालमधील शक्तीशाली राजकीय पक्षाचे नेते चारू मुजुमदार व त्यांचे सहकारी कानू सन्याल यांनी मार्गदर्शन केले व नेतृत्व दिले. येथे नोंद घेण्यासारखी एक बाब म्हणजे 'नक्षलबाडी' जेव्हा घडले तेव्हा पश्चिम बंगालमध्ये 'युनायटेड फ्रंट'चे सरकार होते व ह्या 'युनायटेड फ्रंट'मध्ये कम्युनिस्ट पार्टी ऑफ इंडिया (सीपीआय), कम्युनिस्ट पार्टी ऑफ इंडिया-मार्क्सिस्ट (सीपीआयएम्), बांगला काँग्रेस इत्यादी आठहून जास्त राजकीय पक्षांचा सहभाग होता व ह्यातील सीपीआय व सीपीआय (एम्) ह्या पक्षांची शेतमजूरांना सहानुभूती होती; असे असूनही 'नक्षलबाडी' घडावी हे एक आश्चर्य होते. मात्र, आपण व्यवस्थीत विचार केल्यास व भारतातील साम्यवादी वा कम्युनिस्ट चळवळीचा अभ्यास केल्यास असे लक्षात येते की, ह्या चळवळीला व ह्या चळवळीच्या नेत्यांना सुरुवातीपासूनच भारतातील आर्थिक, सामाजिक, राजकीय व सांस्कृतिक स्थितीचे व इतिहासाचे आकलन झालेच नाही. त्यामुळे

साम्यवादी वा कम्युनिस्ट नेत्यांनी मुळात सुरुवातीला रशियाचे साम्यवादी 'मॉडेल' आयात केले. कालांतराने भारतीय साम्यवादी बंधुंना वाटले की, रशियाच्या मॉडेलमध्ये काही 'दम' नाही. तसेच १९६२च्या भारत–चीन युद्धानंतर 'साम्यवादी रशिया वा कम्युनिस्ट रशिया' 'लोकशाहीवादी भारताचा' मित्र होत चालला आहे हे जाणवल्यावर काही साम्यवादी धुरिणांनी चीनचा 'माओवादी' छाप असणारा साम्यवाद आयात केला. त्यांच्या हे कधीच लक्षात आले नाही की, भारतीय लोक खूप सोशिक आहेत. त्यांना देखील बदलत्या काळाप्रमाणे बदल हवे असतात. मात्र ही बदल घडण्याची भारतातील पद्धत उत्क्रांतीवादी म्हणजेच समूळ वा पूर्ण बदल पण हळूवारपणे ही आहे. भारतीय माणूस इतिहासात कधीच क्रांतीच्या मार्गाला लागला नाही. तसेच भारतात 'वर्ग' नसून 'जाती' आहेत. त्यामुळे साम्यवादी चळवळीत नेहमीच मतांची विविधता असल्यामुळे व मतैक्य नसल्यामुळे फाटाफुटी व अनेक प्रकारचे व विविध नावांचे साम्यवादी पक्ष वा कम्युनिस्ट पक्ष अस्तित्वात आलेले आढळतात. अजून एक महत्त्वाची गोष्ट म्हणजे जेव्हा 'नक्षलबाडी' घडत होती वा घडली तेव्हा बरेच साम्यवादी बंगाल राज्यात सत्तेत होते व असे म्हटले जाते की, सत्ता भल्याभल्यांची विचारशैली बदलून टाकते. त्यामुळे ह्या सत्ताधारी साम्यवाद्यांना आपल्या 'क्रांतीकारक' विचारशैलीचा विसर पडला व सत्तेची भुरळ पडली. त्यामुळे 'नक्षलबाडी' आपली सत्ता धोक्यात आणू शकते असे लक्षात आल्यावर युनायटेड फ्रंट सरकारने 'नक्षलबाडी'चे बंड मोडून काढण्याचा प्रयत्न केला वा तसे करण्यास प्राधान्य दिले.

चारू मुजुमदार (मजुमदार असे देखील म्हणतात) ह्या कम्युनिस्ट पार्टी ऑफ इंडिया (मार्क्सिस्ट) पक्षाच्या अती डावी विचारशैली असणाऱ्या नेत्याने युनायटेड फ्रंट सरकारला घरचा आहेर दिला. चारू मुजुमदारांनी व त्यांचे सरकारी कानू सन्याल यांनी 'नक्षलबाडी'च्या बंडाला पूर्ण पाठिंबा दिला. चारू मुजुमदार यांचा जन्म १९१८ साली तत्कालीन बंगाल इलाख्यातील सिलीगुडी येथे एका सधन जमीनदार घरात झाला. त्यांचे वडील स्वातंत्र्य सैनिक होते. चारू मुजुमदार यांनी १९३८ साली महाविद्यालयीन शिक्षण सोडून देऊन स्वातंत्र्य लढ्यात उडी घेतली व भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे सदस्य बनले. कालांतराने ते कम्युनिस्ट पार्टी ऑफ इंडिया ह्या राजकीय पक्षाकडे आकर्षित झाले. ह्या दरम्यान त्यांचे विडी कामगारांसाठीचे कार्य चालू होते. ह्याच चारू मुजुमदारांनी लिहिलेले आठ लेख म्हणजे नक्षलवादी चळवळीची एक प्रकारची 'घटना' वा मार्गदर्शनपर ग्रंथ बनला. चारू मजूमदारांचा १९७२ मध्ये पोलीस कोठडीमध्ये मृत्यू झाला.

चारू मजुमदारांनी तर नक्षलवादी चळवळ सुरू होण्याच्या काळात महात्मा गांधी, राजा राममोहन रॉय, ईश्वरचंद्र विद्यासागर, स्वामी विवेकानंद इत्यादी राष्ट्रपुरुषांवर टीका केलेली आढळते. त्यांच्यामते ह्या सर्वांची साम्राज्यवादी ब्रिटिश राजवटीसोबत सुंदोपसुंदी होती. त्यामुळे चारू मुजुमदार व त्यांच्या साथीदारांवर अनेकदा अशी टीका होते की, हे सर्वजण राजकीय व आर्थिक क्रांतीवरच भर देणारे एकप्रकारचे राजकारणी होते; मात्र त्यांच्या खाजगी जीवनात अतिशय धार्मिक कर्मठपणा पाळणारे होते.

कानू सन्याल यांचा देखील जन्म बंगालमध्ये १९३२ मध्ये झाला. ह्यांनी चारू मुजुमदारांसोबत अनेक वर्षे काम केले. त्यांनी 'नक्षलबाडी'च्या बंडाचे नेतृत्वदेखील केले. अगदी २००६ साली पश्चिम बंगालमध्ये टाटा मोटर्सने सिंगुर येथे 'नॅनो' कार बनविण्यासाठी जमीन संपादन करून कारखाना बनविण्याची जी योजना आखली होती त्यास कानु सन्याल यांनी देखील विरोध केला होता. शेवटी टाटा मोटर्स कंपनीला २००८ साली सिंगुर येथील आपला प्रकल्प रद्द करून तो गुजराथमध्ये हलवावा लागला होता.

२३ मार्च २०१० रोजी सन्याल यांचा मृतदेह त्यांच्या 'सेफतुल्ला जोते' ह्या गावातील राहत्या घरी

गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळला. असे म्हणतात की, ते आजारी होते व त्यांनी गळफास घेऊन आत्महत्या केली.

१९४६ साली उत्तर आंध्र प्रदेशात म्हणजेच सध्याच्या तेलंगणा राज्यात एक उठाव झालेला आढळतो. कम्युनिस्ट पार्टी ऑफ इंडियाला येथील जनतेला शस्त्रे देऊन लढा देण्यासाठी एकत्रित आणण्याची संधी मिळाली. अशा तऱ्हेने कम्युनिस्टांना बंगाल व आंध्र प्रदेशाची नाळ जोडण्यात यश लाभले असे म्हणण्यास हरकत नाही. दोन्ही राज्यांमध्ये समस्येचे स्वरूप जवळ-जवळ सारखेच होते व ते म्हणजे जमीनदार विरूद्ध शेतमजूर असे होय. नंतरच्या काळात नक्षलवाद्यांनी दंडकारण्य म्हणजेच सध्याचा छत्तीसगढ, तेलंगण, महाराष्ट्र, ओडिशा इत्यादी राज्यांतील डोंगराळ व दुर्गम भागात राहणाऱ्या आदिवासींना देखील चळवळीत ओढलेले आढळते.

१९६७ च्या 'नक्षलबाडी' नंतर १९६८ साली आंध्र प्रदेशातील चळवळीने पुन्हा उचल घेतलेली आढळते व १९६९ मध्येच बंगालमध्ये देखील नक्षलवादी चळवळीने नव्याने बळ घेऊन जमिनदारांची हत्या, मालमत्तेचे पुनर्वाटप व शेतमजूरांची कर्जमाफी इत्यादी घटना घडलेल्या निदर्शनास येतात. ह्याचवर्षी चारू मुजुमदारांनी कम्युनिस्ट पार्टी ऑफ इंडिया (मार्क्सिस्ट) ह्या पक्षातून बाहेर पडून कम्युनिस्ट पार्टी ऑफ (मार्क्सिस्ट-लेनिनिस्ट-एम.एल्.) ह्या अती जहाल व कडव्या साम्यवादी पक्षाची स्थापना केली. हा पक्ष 'पूर्णक्रांती', बळाचा, हिंसेचा व शस्त्रांचा पुरेपूर वापर करणे इत्यादी घातक विचारांमध्ये व तंत्रांमध्ये ठाम विश्वास असणारा पक्ष होता. ह्या पक्षाची माओच्या राजकीय सत्ता केवळ हिंसेमधून-बंदुकीच्या नळीतून मिळते ह्या विचारावर गाढ श्रद्धा होती. 'नक्षलबाडी'च्या बंडात आदिवासी शेतमजूरांनी शस्त्र हातात उचलले होते व त्यांना शस्त्राची ताकद काय असते ते समजले होते. त्यामुळे त्याची चटक लागली होती. येथून पुढे त्यांचे उद्दीष्ट देशातील विविध भागांतील शेतमजूर व आदिवासींना जमीनदारांच्या व शोषणकर्त्यांच्या विरोधात संघटीत करून शस्त्राच्या बळावर मुक्त करावयाचे होते. असे अनेक भाग त्यांना मुक्त म्हणजेच 'लिबरेट'-Liberate करावयाचे होते व अशा प्रदेशांना ते 'मुक्त भूभाग' वा 'लिबरेटेड झोन' (Liberated Zone) असे संबोधणार होते. अशा 'मुक्त भूभागांवर' नक्षलवाद्यांच्या मते 'भारत सरकारचे' आधिपत्य वा राज्य राहणार नसून नक्षलवाद्यांची स्वतंत्र राजकीय प्रणाली असेल. दुर्दैवाने वर नमूद केलेल्या भारतातील अनेक राज्यांतील अतिदुर्गम व डोंगराळ अशा अरण्यमय भागांत असे अनेक लिबरेटेड झोन्स अस्तित्वात आहेत. ह्या लिबरेटेड झोन्समध्ये भारत सरकारचे कायदे नसून नक्षलवाद्यांचे कायदे चालतात. येथे प्रवेशदेखील करण्यास सरकारी अधिकारी वा नोकर धजत नाहीत वा तसे करण्यास ते अनेकदा तयारच नसतात. धोक्याची बाब म्हणजे ह्याच प्रदेशांमध्ये भारतातील जंगलसंपत्ती व खनिजसंपत्ती एकवटलेली आहे. ह्या सं-साधनांचा वा संपत्तीचा भारत सरकारला पूर्णतः वापर करता येत नाही. तसेच येथे सरकारने उचललेल्या कोणत्याही प्रकारच्या औद्योगिकीकरणाच्या प्रस्तावांना वा प्रकल्पांना नक्षलवादी हाणून पाडतात व गुंतवणूकदारांना पळवून लावतात. त्यामुळे 'नक्षलवाद' म्हणजे भारताच्या आर्थिक प्रगतीतील विघ्न होय असे अनेक राजकीय पक्षांच्या नेत्यांना वाटते. एवढेच नव्हे तर हे नक्षलवादी चीनसारख्या भारताच्या शत्रू राष्ट्राचे नेते माओ-झे-दंग ह्यांना आपले प्रेरणास्थान मानतात. ह्याच माओंच्या आदेशानुसार चीनने १९६२ साली भारतावर आक्रमण करून भारताचा बराचसा भूप्रदेश (प्रामुख्याने काश्मिरमधील) गिळंकृत केला होता. आजही हा देश भारतातील 'अरुणाचल प्रदेश' हे राज्य चीनचाच भूभाग आहे अशी भूमिका घेताना आढळतो. अशा ह्या चीनची भारतातील माओवादी नक्षलवाद्यांविषयी सहानुभूती असल्याशिवाय राहणार नाही किंबहुना ती

आहे असे म्हणणे वावगे ठरणार नाही. चीनने तर 'नक्षलबाडी' ह्या घटनेचे त्याकाळात स्वागतदेखील केले होते. ह्या चिनी 'कनेक्शनमुळे' नक्षलवाद ही भारताच्या अंतर्गत सुरक्षिततेच्या दृष्टीने सर्वात भयंकर समस्या भासते. त्यामुळेच भारताचे माजी पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांनी 'नक्षलवाद' हा भारतास सर्वात मोठा धोका असल्याच्या आशयाचे उद्‌गार काढले होते. तसेच सध्याचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनादेखील हा मोठा धोका असल्याचे जाणवते. त्यामुळेच केंद्रातील लोकशाही आघाडी सरकारने ऑक्टोबर २०१६ मध्ये नक्षलवाद्यांविरूद्ध लष्करी मोहीम सुरू केली आहे. ह्या मोहिमेचे उद्‌दीष्ट अत्याधुनिक शस्त्रास्त्रे व पुरेपूर प्रशिक्षण असलेल्या जवानांचा व पोलीस दलांचा उपयोग करून नक्षलवादी चळवळीचा खातमा करणे हे होय.

अशा तऱ्हेने 'नक्षलबाडी' घटनेनंतर व कम्युनिस्ट पार्टी ऑफ इंडिया (एम्.एल.) ह्या पक्षाच्या स्थापनेनंतर भारतात नक्षलवादी चळवळीची सुरुवात झाली व ही चळवळ आजतागायत चालू आहे. सर्वात महत्त्वाची गंभीर बाब म्हणजे ह्या चळवळीचे उद्‌दीष्ट श्रमकरी व आदिवासींच्या हिताचे रक्षण करणे एवढे मर्यादित स्वरूपाचे नसून येथील लोकशाहीवादी सरकाराचा व राजकीय प्रणालीचा पाडाव करून आपली राजकीय सत्ता प्रस्थापित करणे हे आहे. ह्याच मुद्द्याच्या व लिबरेटेड झोन्स व मुक्त प्रदेशांच्या अनुषंगाने हेमंत कर्णिक लिखित 'कोंडी आदिवासींची आणि नक्षलवाद्यांची' ह्या पुस्तकातील खालील तीन परिच्छेद बोलके आहेत व नक्षलवाद भारतास कशाप्रकारे धोकादायक आहे हे अधोरेखित होते.

''आजतागायत नक्षलवाद्यांनी प्रस्थापित व्यवस्थेबद्दल तिटकारा निर्माण झाल्यानंतर व्यवस्थेच्या पोलीस, महसूल वसुली अधिकारी अशा घटकांवर हल्ले करून त्यांना तिथून पळून जायला भाग पाडलं आहे आणि त्यानंतर तो प्रदेश मुक्त प्रदेश म्हणून जाहीर केलं आहे.''

एक प्रदेश मुक्त झाला म्हणून नक्षलवादी स्वस्थ होत नाहीत. त्यांची नजर मग इतर भागांकडे वळते. मुक्त झालेल्या भागाला पाया बनवून त्यांनी भोवतीच्या प्रदेशांवर हल्ले केले आहेत. त्याकरता मुक्त प्रदेशातून सहानुभूतीदारांमधून होतकरूंना निवडून गनिमी काव्याने लढण्यासाठी दलं निर्माण केली आहेत. त्यांच्या हुकमतीला मान्यता मिळवण्यासाठी अशा दलांद्वारे दंडक घालून देणारी हिंसा केली आहे. या सगळ्या वाटचालीतून अनेक मुक्त प्रदेश तयार व्हावेत आणि त्या प्रदेशांचा वेढा शहरांना पडावा, असा त्यांचा माओप्रणीत व्यूह राहिला आहे. आदिवासींना वा अन्य श्रमिकांना न्याय मिळवून देणे, एवढे मर्यादित ध्येय आपलं नाही; आपल्याला अखेरीस पूर्ण सत्ता काबीज करायची आहे, याकडे त्यांचं दुर्लक्ष कधीही झालेलं नाही. नक्षलबाडी उठावाचे एक नेते चारू मुजुमदार यांनी स्पष्टच म्हटलं आहे की, 'आपला सशस्त्र लढा जमिनीसाठी नाही, पिकांसाठी नाही; तो सत्ता काबीज करण्यासाठी आहे.'

मात्र, गनिमी काव्याने लढे लढताना स्थानिक जनतेची सहानुभूती मिळवावी लागते, हे ते विसरत नाहीत. त्यासाठी जुलमी धनवंतांना लुटून त्यांच्या संपत्तीचं वाटप गरिबांच्यात करणे, जुलमी व्यक्तींना सजा करणे, श्रमिकांशी गोडीगुलाबीचा व्यवहार ठेवणे, अशी पथ्यं ते पाळत असतात. दुसऱ्या बाजूला जर सरकारी अंमलदार किंवा दुकानदार किंवा व्यापारी जुलूम करणार असेल, श्रमिकांना तुच्छ लेखत त्यांचं जास्तीत जास्त शोषण करण्याचा प्रयत्न करणार असेल, त्यांच्या जगण्याची, सुरक्षिततेची, इतरांशी सन्मानाने संबंध ठेवण्याची शाश्वतीच काढून घेणार असेल; तर तळागाळातला गावकरी नक्षलवाद्यांना सामील झाला, तर ती आश्चर्याची बाब ठरू नये.''

नक्षलवादी चळवळीला भारतीय समाजातील प्रतिष्ठित व बुद्धिवादी वर्गाचे प्रतिनिधित्व करणाऱ्या व्यक्तिंचादेखील पाठिंबा असलेले जाणवते. उदाहरणच द्यायचे झाले तर अरुंधती रॉय यांचे उदाहरण देता येईल.

अरुंधती रॉय ह्या भारतीय वंशाच्या इंग्रजी भाषेतील प्रसिद्ध लेखिका आहेत. त्यांनी 'द गॉड ऑफ स्मॉल थिंग्ज्' ह्या प्रसिद्ध इंग्रजी कादंबरीचे लिखाण केलेले आहे. त्यांना आपल्या ह्या लिखाणासाठी युरोपमधील युनायटेड किंग्डम या देशातील अतिशय मानाचा व प्रतिष्ठेचा समजला जाणारा 'बुकर' पुरस्कारदेखील मिळालेला आहे. वाचकांना येथे अजून एक रोचक माहिती सांगाविशी वाटते, ती अशी की, अरुंधती रॉय यांनी 'मेसी साहब' नामक हिंदी चित्रपटातदेखील काम केलेले आहे. हा चित्रपट बिटिश काळातील सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कामकाजाच्या पार्श्वभूमीवर व गंमती जंमतीवर बनवलेला आहे. ह्या चित्रपटात रघुवीर यादव ह्या अभिनेत्याने प्रमुख भूमिका केलेली आहे. अरुंधती रॉय यांनी या चित्रपटात एका आदिवासी स्त्रीची भूमिका निभावलेली आहे. असो, तर ह्या अरुंधती रॉय यांचे असे म्हणणे आहे की, जर एखाद्याच्या बायकोवर बलात्कार केला जात असेल, त्यांची जमीन हिसकावून घेतली जात असेल व इतर अन्याय व अत्याचार केले जात असतील तर नक्षलवाद्यांनी हातात शस्त्र उचलण्यात काही वावगे नाही. अशाच प्रकारे भारतातील पिपल्स युनियन फॉर सिव्हिल राईटस् (People's Union for Civil Rights) ह्या संस्थेशी निगडित असलेले मानवी हक्कांसाठी लढणारे प्रसिद्ध कार्यकर्ते विनायक सेन यांना देखील नक्षवाद्यांविषयी सहानुभूती असल्याचे म्हटले जाते. त्यामुळे त्यांना मे २००७ मध्ये छत्तीगढ सरकारने अटक केली होती. विनायक सेन यांना अटक झाल्यानंतर समाजातील अनेक बुद्धिवादी लोकांनी निषेध केला होता. विनायक सेन हे बालरोग तज्ज्ञ असून त्यांना अनेक राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पुरस्कारांनी सन्मानीत करण्यात आलेले आहे. त्यांनी छत्तीसगढ राज्यातील आदिवासींमध्ये काम केलेले असून आपल्या वैद्यकीय सेवा त्यांना पुरविलेल्या आहेत. एवढेच नव्हे तर त्यांनी छत्तीसगढ सरकारसोबत देखील काम केलेले आहे. सेन यांचे म्हणणे आहे की, नक्षलवाद्यांविरूद्ध कारवाई करताना सरकारी यंत्रणांकडून व पोलिसांकडून मानवी अधिकारांचे उल्लंघन केले जाते. त्यामुळे सरकारने अशा कारवायांऐवजी त्यांच्यासोबत शांततामय चर्चेचा अहिंसेचा मार्ग अवलंबणे संयुक्तिक ठरेल.

कम्युनिस्ट पार्टी ऑफ इंडिया (एम्.एल.) ह्या पक्षाची नंतरच्या काळात अनेक शकलं उडालेली दिसतात व त्यातून निर्माण झालेल्या विविध गटांचे नेतृत्व विनोद मिश्रा, महादेव मुखर्जी, संतोष राणा, चंद्र पुल्ल रेड्डी, तारीमला नागी रेड्डी, अपालसुरी इत्यादी नेते मंडळींनी केलेले आढळते. अशाप्रकारे कम्युनिस्ट पक्षाचे फुटून नवीन गट निर्माण होत होते व पूर्वीचे गट एकमेकांत सामावून जाऊन वा विलीन होऊन नवीन गट निर्माण होत होते व त्याचसोबत नक्षलवादी चळवळदेखील जोमाने चालू होती. ह्या काळात ह्या चळवळीला चीनचा वैचारिक, तात्विक, नैतिक, बौद्धिक व आर्थिक पाठिंबा होता व ही चळवळ अगोदर नमूद केलेल्या राज्यांमध्ये जोमाने फोफावत चालली होती.

१९८० मध्ये आंध्रप्रदेशात कोंडापल्ली सीतारम्मैया हे कम्युनिस्ट पार्टी ऑफ इंडिया (एम्.एल्.) मधून वेगळे झाले व त्यांनी तत्कालीन आंध्र प्रदेश ह्या राज्यातील करीमनगर जिल्ह्यात पिपल्स् वॉर ग्रुपची-पीडब्लूजी (People's War Group-PWG) स्थापना केली. सध्या करीमनगर हा जिल्हा नव्याने निर्माण झालेल्या तेलंगण ह्या राज्यात मोडतो. यानंतर १९९२ मध्ये मुप्पला लक्ष्मण राव ऊर्फ गणपती यांनी कोंडापल्ली सीतारमैय्या यांची हकालपट्टी करून पीपल्स् वॉर ग्रुपचे नेतृत्व आपल्या ताब्यात घेतले.

अशाप्रकारे विविध गट एकमेकांत मिसळून नवीन गट निर्माण होण्याची प्रक्रिया सुरूच होती व २००३ साली माओइस्ट कम्युनिस्ट सेंटर ऑफ इंडिया (एम्.सी.सी.आय.) ची स्थापना झाली. २००४ साली पीपल्स् वॉर ग्रुप व एम.सी.सी.आय. एकमेकांत विलीन

काही वेळा लोक तुमच्यातला कमीपणा पुढे आणण्याचा प्रयत्न करू शकतात.
कारण ते तुमच्यातला चांगुलपणा सांभाळू शकत नाहीत!

होऊन भारतातील सर्वात खतरनाक व धोकादायक नक्षलवादी संघटनेची स्थापना झाली व ही संघटना म्हणजे कम्युनिस्ट पार्टी ऑफ इंडिया (माओइस्ट–एम्) ही होय. २०१४ साली कम्युनिस्ट पार्टी ऑफ इंडिया (एम.एल.) म्हणजेच 'नक्षलबाडी'स कारणीभूत ठरलेली संघटनादेखील कम्युनिस्ट पार्टी ऑफ इंडिया (माओइस्ट वा माओवादी) मध्ये विलीन झाली आहे. ह्या संघटनेवर भारत सरकारच्या अनलॉफुल ॲक्टीव्हिटीज् (प्रिव्हेनशन) ॲक्ट – UAPA नुसार बंदी घालण्यात आली आहे.

साधारणतः असे म्हटले जाते की, अतिशय गरीब असलेल्या कुटुंबातील तरुण, श्रीमंत शेतकऱ्यांकडून होणाऱ्या शोषणाला कंटाळून चळवळ करण्यामध्ये पुढाकार घेतात वा नक्षलवादाकडे आकर्षित होतात. परंतु अनेकदा असे निदर्शनास आले आहे की, श्रीमंत वा सधन शेतकरी कुटुंबांचा देखील नक्षलवाद्यांना पाठिंबा असून ते अनेकवेळा नक्षलवादी नेत्यांना छुपा व खुला पाठिंबा देतात वा त्यांचे रक्षण करतात. याबाबतीत येथे आंध्र प्रदेश ह्या राज्याचे उदाहरण देता येईल. ह्या राज्यातील अनेक बडे राजकारणीसुद्धा नक्षलवाद्यांना आपल्या राजकीय फायद्यासाठी मदत करताना आढळतात. आपण चर्चा केल्याप्रमाणे भारतातील आंध्र प्रदेश ह्या राज्यामध्ये नक्षलवादी चळवळीचा जोर आहे. ह्या राज्यातील अनंतपुर हा जिल्हा नक्षलवादी चळवळीचे एक प्रमुख केंद्र मानला जातो. असे म्हटले जाते की, ह्या जिल्ह्यातील परीतला ह्या मातब्बर राजकारणी कुटुंबाचा येथील नक्षलवादी नेते मंडळींना आधार असलेला जाणवतो. काही अभ्यासकांचे तर म्हणणे आहे की, ह्या कुटुंबाने आपल्या राजकारणासाठी नक्षलवादी चळवळीला अनंतपूर जिल्ह्यात जोपासलेले होते. ह्या कुटुंबातील परीतला श्रीरामुलु ह्या इसमाचे आंध्र प्रदेशातील पिपल्स् वॉर ग्रूप ह्या नक्षलवादी वा माओवादी संघटनेच्या कोंडापल्ली सितारम्मैया ह्या नेत्यासोबत घनिष्ट संबंध होते. त्यामुळे शहरी भागात जशी राजकारणी व गुन्हेगारांच्या संबंधांविषयी चर्चा व्हायची व आजही होते तोच प्रकार दक्षिणेकडील आंध्र प्रदेश व तेलंगण ह्या राज्यात राजकारणी व नक्षलवाद्यांच्या संदर्भात होत असताना दिसतो.

महाराष्ट्रापुरता विचार केला तर महाराष्ट्रातील गडचिरोली जिल्ह्याच्या बऱ्याचशा भागांवर नक्षलवाद्यांचे वर्चस्व असल्याचे जाणवते. डोंगराळ व दुर्गम भागात राहणाऱ्या आदिवासींमध्ये नक्षलवादी लोकप्रिय असण्याचे एक अतिशय महत्त्वाचे कारण म्हणजे नक्षलवादी अशा भागांमधून सार्वजनिक वा सामाजिक श्रमदानातून रस्ते बांधण्याचे, पिण्याच्या पाण्याची व शेतीच्या पाण्यासाठीची व्यवस्था करून देण्यासाठीची व येथील आदिवासींच्या इतर गरजा पुरविणारी कामे करताना आढळतात. नेमके ह्याच बाबतीत सरकारी यंत्रणा नक्षलग्रस्त भागात अतिशय निष्क्रीय असल्याचे जाणकारांचे मत आहे. नक्षलवादी एवढेच करून थांबत नाहीत तर आदिवासी, दलित व गरीब जनतेचे सामाजिक व आर्थिक शोषण करणाऱ्यांना त्वरित शिक्षा वा दंड करताना आढळतात. त्यामुळे आपसुकच ह्या वर्गातील लोक नक्षलवाद व नक्षलवाद्यांकडे ओढले जातात.

नक्षलवादी चळवळ अशा तऱ्हेने गेली अर्धशतक एवढा काळ भारतात अव्याहतपणे चालू आहे. ह्या चळवळीला सरकारने एक गंभीर स्वरुपाची कायदा व सुरक्षेस धोका पोहचवू शकणारी चळवळ ह्या दृष्टीकोनातून पाहिले आहे. त्यामुळेच आजपर्यंत केंद्र सरकारने व विविध राज्यसरकारांनी कायद्यांच्या सहाय्याने ह्या चळवळीवर निर्बंध टाकण्याचा प्रयत्न केला आहे. त्याचप्रमाणे नक्षलवादाविरूद्ध वा नक्षलवाद्यांविरूद्ध पोलिसी व सैनिकी बळाचा वापर केलेला आहे. ह्यातूनच नक्षलग्रस्त राज्यांच्या पोलीस यंत्रणेला अत्याधुनिक प्रशिक्षण व शस्त्रास्त्रे देण्याचे धोरण, त्यांना इतरांपेक्षा जास्त पगार देणे, नक्षलवाद्यांविरूद्ध लढत असताना मृत्युमुखी पडल्यावर इतरांपेक्षा विम्याची रक्कम जास्त देणे, मृताच्या वारसाला सरकारी नोकरी देणे इत्यादी

जे लोक तुमच्यावर विश्वास ठेवतात त्यांच्याशी कधीही खोटं बोलू नका
आणि जे तुमच्याशी खोटं बोलतात त्यांच्यावर कधीही विश्वास ठेवू नका.

प्रकारची धोरणे राबविण्यात आली व अजूनही राबविण्यात येत आहे. यामागचे एकमेव कारण म्हणजे नक्षलवाद्यांना जशास तसे उत्तर देण्याकरिता लढवय्या तरुणांना पोलीस यंत्रणेत भरती होण्यासाठी उद्युक्त वा प्रवृत्त करणे हे होय. याबाबतीत त्याकाळचा आंध्रप्रदेश म्हणजेच सध्याची तेलंगण व आंध्र प्रदेश ह्या राज्यांचे उदाहरण बोलके आहे. एकत्रित आंध्र प्रदेशात ग्रेहाऊंडस् (Greyhounds) हे विशेष पोलिसी पथक फक्त नक्षलवाद्यांविरूद्धच लढण्याचे काम करत असे. ह्या ग्रेहाऊंडस्च्या मदतीने आंध्र सरकारला नक्षलवाद्यांचा कणा तोडण्यात बऱ्याच अंशी यश आल्याचे जाणकारांचे मत आहे.

नक्षलग्रस्त राज्यांतील सरकारांनी आपापल्या पालिसी यंत्रणांमार्फत नक्षलवाद्यांविरूद्धचा लढा सुरू ठेवला आहे. ह्या लढ्याला २०१६ साली निर्णायक रूप प्राप्त झाले आहे. याचे कारण केंद्र सरकारने २३ व २४ ऑक्टोबर २०१६च्या मध्यरात्री छत्तीसगढ, ओडिशा, महाराष्ट्र, आंध्र प्रदेश ह्या राज्यांच्या मदतीने ओडिशा व छत्तीगढ यांच्या सीमेवरील मलकनगिरी जिल्ह्यातील रामगुडा ह्या गावावर हल्ला केला. ह्या हल्ल्यात अनेक नक्षलवाद्यांसोबत त्यांचे नेतेदेखील ठार झाल्याचे सरकारचे म्हणणे असून येथे जवळ जवळ १५० माओवादी जाणार होते अशी सरकारकडे माहिति होती.

ह्या कारवाईचे वैशिष्ट्य म्हणजे ह्या हल्ल्यासाठी सरकारने अत्याधुनिक शस्त्रांस्त्रांसोबत हेलीकॉप्टर्सचा देखील वापर केला. दुर्दैवाची बाब म्हणजे पोलिसांनी कारवाई दरम्यान बेछूट गोळीबार करून अनेक निरपराध्यांचे देखील प्राण घेतल्याचे व आदिवासींच्या घरांची नासधूस केल्याचे नक्षलवाद्यांचे म्हणणे आहे. पोलिसांनी असे केले असेल तर ते निश्चितपणे चुकीचे आहे. ह्या कारवाईमुळे आपले खूप नुकसान झाल्याचे नक्षलवाद्यांनी मान्य केले आहे. ह्या घटने नंतर अनेक लोक म्हणताना आढळतात की, आता सरकार वीरप्पन प्रमाणे नक्षलवाद्यांचा निश्चितच अंत करेल. मात्र, लगेचच हा असा निष्कर्ष काढणे म्हणजे पोरखेळ ठरेल. कारण वीरप्पन हा एक प्रकारचा लूटारू, दरोडेखोर व तस्कर होता. चंदनाच्या लाकडाची व हस्तीदंताची चोरी करून त्याची तस्करी करणे हा त्याचा 'धंदा' होता. 'नक्षलवाद' हे त्यापेक्षा फार वेगळे रसायन आहे. ह्यांना एका विशिष्ट विचारशैलीची बैठक आहे. त्यांचे ध्येय्य क्रांती हे आहे. त्यांना नाही म्हटले तरी शेतमजूर व आदिवासींचा पाठिंबा आहे व ह्यांच्या बंडाची व्याप्ती भारताच्या जवळ-जवळ आठ राज्यांमध्ये आहे. त्यामुळे ह्यांच्यावर एके ठिकाणी हल्ला झाला की, ते दुसऱ्या राज्यात सुरक्षित ठिकाणी दबा धरून राहतात व कालांतराने बाहेर पडून गनिमी काव्याने लढतात. ह्या कारणांमुळेच नक्षलवाद्यांना संपवणे म्हणावे तेवढे सोपे नाही.

वर नमूद केलेल्या मलकनगिरीच्या सरकारी कारवाई नंतर नक्षलवाद्यांनीसुद्धा आव्हान स्वीकारल्याची घोषणा केली आहे व येथून पुढे गनिमी काव्याने जास्त प्रमाणात लढणार नाही याची घोषणा केली आहे. याचा अर्थ नक्षलवादीसुद्धा मैदानात समोरासमोर उतरून भारतीय यंत्रणांसोबत युद्ध करण्यास सज्ज आहेत की काय? अशी शंका मनात येते. ह्या कारवाईचे वैशिष्ट्य म्हणजे तेलंगण ह्या राज्याच्या राज्य सरकारने व पर्यायाने मुख्यमंत्री के. चंद्रशेखर राव (केसीआर) यांनी ह्या कारवाईला पाठिंबा दर्शविला नाही हे वाचल्यावर आश्चर्य वाटते. कारण आपण पाहिलेच आहे की, दक्षिणेत नक्षलवादाची मुहूर्तमेढ करीमनगर ह्या जिल्ह्यात रोवली गेली व हा जिल्हा तेलंगणामध्ये आहे. तसेच वरंगल, आदिलाबाद, मेडक इत्यादी उत्तर तेलंगणातील जिल्ह्यांनी एकेकाळच्या आंध्र प्रदेशातील नक्षलवादी चळवळीला मोठ्या प्रमाणात नेतृत्व व सदस्य दिल्याचे आढळते. येथील नक्षलवादी चळवळीचे प्रेरणास्थान व तेलुगू साहित्याचे प्राध्यापक, गाढे अभ्यासक व विद्रोही कवी वारावारा राव हे देखील मूळचे वरंगल जिल्ह्याचेच. वारावारा राव यांचा जन्म १९४० साली वरंगलमध्ये तेलुगू ब्राह्मण कुटुंबात झाला. मात्र ते नक्षलवादी चळवळीकडे आकर्षित झाले. त्यांनी

आपल्या कवितांच्या माध्यमातून ह्या चळवळीला प्रेरणा देण्याचे काम केले. त्यामुळेच आंध्र प्रदेश सरकार व नक्षलवाद्यांमध्ये ज्या चर्चा झाल्या त्यावेळी अनेकदा वारावारा राव हे नक्षलवाद्यांचे प्रतिनिधित्व करत असत. वारावारा राव यांच्यावर अनेक हल्ले झालेले आहेत व आंध्र व तेलंगणाच्या सरकारने यांना अनेकदा अटक केल्याचे जाणवते. तर येथे मुद्दा हा आहे की, सद्यस्थितीत तेलंगण सरकार 'मलकनगिरी' कारवाईवर टीका करताना का आढळते? ह्या प्रश्नाचे उत्तर देताना तेलंगणातील दुसरे एक विद्रोही कवी, नक्षलवादी नेते व स्वतंत्र तेलंगणाचे खंदे पुरस्कर्ते 'गदर' यांचे नाव घ्यावे लागेल. गदर यांचे मूळ वा खरे नाव गुमाडी विठ्ठल राव हे होय. गदर हे त्यांचे टोपण नाव असून स्वातंत्र्यपूर्व भारतातील गदर पार्टीला सलाम वा आदरांजली म्हणून गुमाडी विठ्ठल राव यांनी गदर हे नाव स्विकारले आहे व यातून त्यांना कुठेतरी 'क्रांती' देखील अर्थात नक्षलवादी क्रांती अभिप्रेत आहे. ह्यांचा जन्म तेलगंणातील मेडक जिल्ह्यातील तुपरान ह्या गावात झाला. ह्यांचे सुरुवातीचे शिक्षण निझामाबाद जिल्ह्यातील बोधन ह्या ठिकाणी झाले व पुढील शिक्षणासाठी ते हैदराबादला गेले.

गदर यांनी आपल्या विद्रोही कवितेतून नक्षलवाद्यांना प्रेरणा दिल्याचे काम केलेले आहे व सुरुवातीपासूनच स्वतंत्र तेलंगणाच्या चळवळीला पाठिंबा दिलेला आहे. गदर यांचे ''अम्मा तेलंगणामा अकाली केकला गानाम्मा'' (Amma Telanganama Akali Kekala Gaanama) हे गाणे तेलंगणा राज्याचे अधिकृत राज्य गीत म्हणून निवडण्यात आले आहे. गदर स्वतंत्र तेलंगणा चळवळी सोबतच नक्षलवादी चळवळीसोबत देखील जोडलेले असल्यामुळे कदाचित तेलंगण राज्य नक्षलवादी चळवळीकडे सध्या तरी कानाडोळा करत आहे असे जाणवते.

माओवाद्यांच्या वा नक्षलवाद्यांच्या प्रमुख नेत्यांमध्ये वा त्यांच्याविषयी सहानुभूती असणाऱ्यांमध्ये व नक्षलवादाचा अभ्यास करणाऱ्यांमध्ये दिवंकर भट्टाचार्य, मनोरंजन मोहांती, कामेश्वर बैथा, अभिजीत मजूमदार, वारावारा राव, विनायक सेन यांचा समावेश होतो. तर नेपाळमधील माओवाद्यांच्या प्रमुख नेतेमंडळींमध्ये सुरुवातीस नमूद केल्याप्रमाणे नेपाळचे सध्याचे पंतप्रधान पुष्प कमल दहल ऊर्फ प्रचंड, बाबुराम भट्टाराय व आनंद वर्मा आदींचा समावेश होतो. वर उल्लेख केलेल्या व्यक्तींपैकी अभिजीत मजूमदार हे चारू मुजुमदार यांचे चिरंजीव होत. त्यांच्यामते २८ जुलै १९७२ रोजी त्यांच्या वडिलांचा पोलीस कोठडीत झालेला मृत्यू हा नैसर्गिक नसून तो ठरवून केलेला खून होता. त्यांच्यामते त्याकाळात प्रसार माध्यमांनी चारू मुजुमदार यांच्यावर अन्याय केला व ते जणूकाही वेडे आहेत की काय असे चित्र रंगविले. अभिजित यांच्या म्हणण्यानुसार चारू मुजुमदार हे अतिशय प्रेमळ स्वभावाचे होते व त्यांनी अभिजित व त्यांच्या दोन बहिणींमध्ये संगीताची व वाचनाची गोडी लावली होती.

मनोरंजन मोहांती हे जागतिक ख्यातीचे इतिहासकार असून त्यांनी पदव्युत्तर पदवीचे शिक्षण (एम्.ए.) दिल्ली येथून घेतले तर विद्यावाचस्पतीची पदवी (पीएच्.डी.) अमेरिकेतील कॅलीफोर्निया विद्यापीठातून मिळविली आहे. ते प्रसिद्ध राजकीय विश्लेषक व चीनसंबंधीचे आघाडीचे तज्ज्ञ मानले जातात.

कामेश्वर बैथा हे तर लोकसभेवर खासदार म्हणून निवडून आले होते हे मूळचे झारखंड ह्या राज्यातील पालामू ह्या जिल्ह्यातील आहेत. त्यांची स्वतःची नक्षलवादाची पार्श्वभूमी आहे.

बाबुराम भट्टाराय हे नेपाळमधील माओवादी नेते भारताशी अतिशय जवळीक असलेले नेते आहेत. कारण त्यांचे शिक्षण भारतात झालेले आहे. आनंद स्वरूप वर्मा हे प्रसिद्ध लेखक व पत्रकार असून त्यांनी नेपाळ तसेच भारतातील माओवाद्यांवर मोठ्या प्रमाणात लिखाण केलेले आहे. त्यांची माओवादी चळवळीचे विश्लेषक म्हणून देखील ओळख आहे.

(पृष्ठ क्र. ३९ वर)

# सुभाषित

*भर्तृहरी या महान संस्कृत कवीच्या लेखणीने श्लोकाद्वारे केलेले हे त्या काळातील समाजचित्रण या लेखात विशद केले आहे - संपादक*

**बोद्धारो मत्सरग्रस्ताः प्रभवः स्मथदूषितः**
**अबोधोपहताश्चान्ये जीर्णमंगे सुभाषितम्।।**

**अर्थ** : विद्वान माणसे मत्सराने ग्रस्त आहेत. श्रीमंत व सत्ताधीश माणसे अहंकार व उद्दामपणाने ग्रस्त आहेत. सामान्यजनांना बुद्धिच्या अभावी काहीच कळत नाही व म्हणून कविला जे सांगायचंय ते त्याच्या शरीरातच जीर्ण होऊन गेलं आहे.

भर्तृहरी या महान संस्कृतकविच्या लेखणीने केलेलं हे त्या काळातलं समाजचित्रण. भर्तृहरी हा राजा होता. 'शतकत्रय' अर्थात 'नीतिशतक' 'शृंगारशतक' व वैराग्यशतक' या तीन रचनांसाठी तो जागतिक साहित्यात अजरामर झाला.

वरील श्लोकात भर्तृहरीने समाजातील एकूणच बौद्धिकांच्या दांभिकतेवर टीका केली आहे. ही आजही तितकीच लागू पडते. समाजातील बौद्धिक, विद्वान वर्ग आपापसातील हेवेदावे व मत्सराने ग्रस्त आहे. 'पण्डितः पण्डितं वीश्य श्वानवत् गुर्गुरायते।' अर्थात 'एक पण्डित (बुद्धिजीवी) दुसऱ्या पण्डिताकडे पाहून कायम कुत्र्यासारखी गुरगुर करतो' असं एक प्रसिद्ध वचन आहे. ज्या विद्वानांनी समाजातील सर्वदूर घटकांपर्यंत जाऊन त्यांच्या अडचणी समजून घ्याव्या व 'अज्ञानी लावावे सन्मार्गासी' या एकनाथांच्या उक्तीप्रमाणे समाजकार्य करावे. ते असं करत नाहीत.

समाजातील श्रीमंत वर्ग, सत्ताधारी वर्ग हा सत्तेत व पैशाच्या मदाने व अहंकाराने ग्रस्त असून त्यांना काही चांगलं ऐकून घेण्यासाठी सवड नाही. ते संपत्तीचा उपभोग घेण्यातच मश्गुल आहेत.

राहिला वर्ग सामान्यजणांचा. हा वर्ग पोटाची खळगी भरण्यात इतका व्यस्त व त्रस्त आहे की त्यांना काही चांगलं ऐकण्याची व ते समजून घेण्याची बौद्धिक कुवत नाही. म्हणून कविला जे सांगायचं होतं ते सांगायचं राहून गेलं. भर्तृहरीने ४० श्लोकात एकूणच समाजाच्या बौद्धिक अधःपतनावर भाष्य केलं आहे.

एकोणिसाव्या शतकाच्या प्रारंभी इंग्लंडमध्ये अशाच प्रकारच्या समाजव्यवस्थेवर थॉमस कार्लाइल व कवी मॅथ्यू अर्नाल्ड याने भाष्य केले आहे. ह्याच्या Dover Beach या जगप्रसिद्ध कवितेत तो म्हणतो -

"Ah, Love, let us be true to one another!
for the world which seems to lie before us like a land of dreams,
Hath really neither joy, nor love, nor light
Nor certitude, nor peace, nor help for pain"

ज्या वेदांनी 'आ नो भद्राः क्रतवो यन्तु विश्वतः।' अर्थात माझ्याकडे सर्व दिशांनी चांगले विचार येवोत ही प्रार्थना केली, त्याच आपल्या देशात सर्वच माणसं आपापल्या विश्वात संकुचित झाली आहेत. 'संकोचोनि काय झालासी लहान, घेई आपोशन ब्रह्मांडाचे' हा तुकोबांचा संदेश आपण ऐकला पाहिजे.

नवनवीन कल्पनांचा अगदी मुक्तपणे वावर समाजात होत नाही. तोपर्यंत कविच्या मनातील सुभाषित असंच जीर्ण होत राहणार. 'राशिद मुमताज' या उर्दू शायरानं म्हटलंय -

'रशिद किसे सुनाते गली में तेरी गझल
उसके मकाँ का कोई दरिचा (दरवाजा) खुला न था'

**- प्रा. प्रशांत धर्माधिकारी**
इंग्रजी विभाग, जोशी-बेडेकर महाविद्यालय, ठाणे

गती पेक्षा योग्य दिशा महत्त्वाची असते, फक्त वेगवान गतीने कुणीही कुठेही पोहोचू शकत नाही.

# परिसर वार्ता

**- संकलित**

## डॉ. बेडेकर विद्या मंदिर, माध्यमिक विभाग

१ फेब्रुवारी जिल्हा परिषद ठाणे तर्फे विविध गुणदर्शन स्पर्धा २०१७ चे आयोजन पोलीस स्कूल ठाणे येथे करण्यात आले होते.

संपूर्ण कार्यक्रमाचे व शेवटी पारितोषिक वितरण समारंभाचे सूत्रसंचालन साधना जोशी यांनी केले.

**शुभेच्छा समारंभ आणि पारिजातक प्रकाशन**

शनिवार दि. ११ फेब्रुवारी २०१७ रोजी इ. १० वीच्या विद्यार्थ्यांसाठी शुभेच्छा समारंभाचे आयोजन केले होते. तसेच शाळेचा वार्षिक अंक 'पारिजातक' याचे प्रकाशनही या दिवशी झाले.

या समारंभाला प्रमुख पाहुणे व अध्यक्ष म्हणून विद्या प्रसारक मंडळाचे सभासद व शाळेचे माजी विद्यार्थी मा. अनिरुद्ध जोशी ह्यांना आमंत्रित केले होते.

शाळेतील पदाधिकारी व सर्व शिक्षकांनी इ.१०वीच्या विद्यार्थ्यांना त्यांच्या भविष्यातील उज्ज्वल यशासाठी शुभेच्छा दिल्या.

**अभिनंदन**

दि.१८ फेब्रुवारी २०१७ रोजी झालेल्या मावळी मंडळ आयोजित 'आंतरशालेय कबड्डी व खो-खो' स्पर्धेत चौदा वयोगटाखालील विद्यार्थ्यांमध्ये आपल्या शाळेतील विद्यार्थिनींनी 'कबड्डी' या क्रीडाप्रकारात तृतीय क्रमांक मिळवून पारितोषिकाचा चषक प्राप्त केला.

तर 'खो-खो' या क्रीडाप्रकारात विद्यार्थी संघाने तृतीय क्रमांक मिळवून पारितोषिकाचा चषक प्राप्त केला. मार्गदर्शक क्रीडाशिक्षक तसेच कु. कल्पना वाघुले (सहा. शिक्षिका) व सहभागी विद्यार्थ्यांचे हार्दिक अभिनंदन!

मंगळवार दि. २८ फेब्रुवारी २०१७ रोजी आपल्या शाळेत ३० वा राष्ट्रीय विज्ञानदिन साजरा करण्यात आला. विज्ञानदिनानिमित्त शाळेतील विद्यार्थ्यांनी आपली मनोगते व्यक्त केली व ती माईकद्वारे सगळ्या वर्गातील विद्यार्थ्यांना ऐकवण्यात आली. ८ वी अ मधील कु. प्रज्ञा मोरे हिने विज्ञानाबद्दल माहिती सांगितली. तसेच सानिका पाटील हिने विक्रम साराभाई स्पेस सेंटर याबद्दल माहिती सांगितली. ७ वी अ मधील नाविण्य मेटकरी याने 'रामण इफेक्ट' बद्दल तर साक्षी पवार हिने 'दैनंदिन जीवनातील विज्ञानाचे महत्त्व' या विषयावर आपले मनोगत व्यक्त केले.

## सौ. आनंदीबाई जोशी पूर्व प्राथमिक विभाग

दिवाळीची सुट्टी संपवून दुसऱ्या सत्राची सुरुवात झाली. दुसरे सत्र विविध उपक्रमांनी भरगच्च असते. या सर्वांचा हा आढावा :

**१७ डिसेंबर वार्षिक स्नेहसंमेलन**

दिवाळीची सुट्टी संपल्यावर वार्षिक स्नेहसंमेलनाची तयारी सुरु झाली. शनिवार १७ डिसेंबरला हा कार्यक्रम विद्यालंकार सभागृहात पार पडला. समोरचे पटांगण पालकांनी भरगच्च भरले होते. कार्यक्रमाची सुरुवात विभाग प्रमुख सौ. मेघना मुळगुंद यांच्या प्रास्ताविकाने व वार्षिक अहवालाने झाली. त्यापुढचा जवळपास १ ते १।। तास के. जी.च्या बालकलाकारांनी सर्व उपस्थितांचे मनोरंजन केले. विविध विषयावरची गाणी, नाटुकले या सर्वात प्रेक्षक गुंग झाले होते.

---

यशस्वी व्हायचं असेल तर फक्त स्वतःच्या क्षमतेवरती विश्वास ठेवा.

**अल्पोपाहार – २१ डिसेंबर**

यावर्षी पावभाजी व अननसाचा शिरा असा अल्पोपहार सर्वांना देण्यात आला. मुलांनी त्याचा आस्वाद घेतला.

**नाताळ – २३ डिसेंबर**

नाताळ २५ डिसेंबरला जगभरात साजरा केला जाणारा सण आम्ही २३ डिसेंबर रोजी मोठ्या आनंदात साजरा केला. शिक्षकांनी येशू ख्रिस्ताची गोष्ट सांगितली. सांताक्लॉजच्या आगमनासाठी शुभेच्छापत्रे, चांदण्या, ख्रिसमसचे झाड अशी सजावट केली होती. एक सिनियरचा मुलगा सांताक्लॉजचे कपडे घालून आला होता. सर्व मुलांबरोबर त्याने नाच केला. गाणी म्हटली व कपकेकचा गोड खाऊ सर्वांना देण्यात आला.

**बाजारहाट – २८ डिसेंबर**

सिनियर के. जी.च्या मुलांनी भेटकार्ड, वॉलहॅंगिंग पाकिटं अशा विविध वस्तू बनवल्या होत्या. तसेच इतर खेळणी व खाऊ या सर्व वस्तूंची विक्री आमच्या बाजारात झाली. सिनियरची काही मुलं दुकानदार झाली होती. तर ज्यूनियरची सर्व गिऱ्हाईकांच्या भूमिकेत होती. खरेदी-विक्रीची संकल्पना यातून मुलांना समजते. आमच्या बाजारात २८ डिसेंबरला खूपच गर्दी झाली होती. मुलांनी त्यांच्या पालकांबरोबर बाजारहाटाची मजा अनुभवली.

**क्रीडादिन – ९ व १० जानेवारी २०१७**

नवीन वर्षातील म्हणजे २०१७ मधील पहिलाच उपक्रम. ज्यूनिअर, सिनियरच्या मुलांचे वय व शारीरिक क्षमता लक्षात घेऊन धावणे, अडथळ्यांची शर्यत, रस्सी खेच, तोल सांभाळून चालणे असे खेळ निवडण्यात आले. क्रीडादिनाचे आयोजन शाळेच्या पटांगणात करण्यात आले. मुलांनी उत्साहाने त्यात सहभाग घेतला. ज्यूनियरच्या सर्व मुलांना पिगीबँक तर सिनियरच्या मुलांना गोष्टींचे पुस्तक अशी भेटवस्तू देण्यात आली.

**संक्रांत – १६ जानेवारी २०१७**

संक्रांत हिवाळ्यात येणारा सण, काळे कपडे, हलवा, तिळगूळ यांनी सजलेला सण १६ जानेवारीला शाळेत साजरा झाला. शिक्षकांनी या ऋतुचे महत्त्व, काळे कपडे व तिळगूळ याचे या अनुशंघाने असलेले महत्त्व मुलांना सांगितले. तसेच देशाचा विविध राज्यात हा सण कसा साजरा केला जातो त्याची माहिती दिली. पतंग, तिळगूळ, ऊस याची चित्रे मुलांनी रंगवली. 'तिळगूळ घ्या गोड बोला' असे म्हणत सर्वांनी एकमेकांना शुभेच्छा दिल्या. सर्व मुलांना तिळगूळ देण्यात आला.

**सहल – १८ जानेवारी २०१७**

वर्षभरातील अनेक उपक्रमांपैकी सर्वात आवडता असा हा सहल कार्यक्रम. यावर्षी १८ जानेवारी घोडबंदर रोडवरी 'विष्णूजी की रसोई' मध्ये आमची सहल गेली होती. जवळपास १९० मुलांनी या सहलीत सहभाग घेतला. मुलांनी ब्रेड, बटरच्या नाश्ताचा आस्वाद घेतला. नंतर विविध खेळ खेळण्यात, गाणी म्हणण्यात मुलं दंग झाली होती. मुलांच्या आवडीची पुरी, भाजी व श्रीखंड असा जेवणाचा बेत होता. यानंतर सादर झालेले जादूचे प्रयोग मुलांना फारच आवडले.

परत निघताना केकचा खाऊ खाल्ला व दमून भागून आम्ही परतीच्या प्रवासाला निघालो.

**प्रजासत्ताक दिन**

देशभरात मोठ्या दिमाखात साजरा होणारा प्रजासत्ता दिन २५ जानेवारीला शाळेत साजरा झाला. हा दिवस का साजरा केला जातो? झेंड्याचे महत्त्वही शिक्षकांनी सांगितले. झेंड्याचे रंग वापरून मुलांनी चित्रे रंगवली. देशभक्तीपर गाणी गायली व झेंड्याला सलामी दिली.

---

कधीही स्वतःच्या आनंदाला दुसऱ्यात शोधू नका; ते तुम्हाला एकटेपणाचं देईल.
त्याऐवजी त्याला स्वतःमध्येच शोधा; जेणेकरून तुम्ही एकटे जरी असाल आनंदी असाल.

**शाळेत मुक्काम**

सिनियर के.जी.च्या मुलांना एक रात्र शाळेत मुक्काम करण्यासाठी स्वावलंबी बनवण्यासाठी हा उपक्रम राबवण्यात येतो. यावर्षी ४ फेब्रुवारी शनिवारी संध्याकाळी ७ वाजता मुलं शाळेत आली. त्यांचे विविध खेळ, नृत्य, गाणी घेण्यात आली. मुलांना पावभाजी व शिरा असा रात्रीच्या जेवणासाठी दिला गेला. रात्री शेकोटी लावून सभोवताली मुलांनी फेर धरून गाणी गायली. नंतर मुले आपापल्या वर्गात झोपी गेली. रविवारी ५ फेब्रुवारीला सकाळी ७ वाजता पालकांसोबत मुले घरी गेली.

**प्रदर्शन**

शाळेत या वर्षी १७ फेब्रुवारी रोजी प्रदर्शन आयोजित केले होते. विविध विषयांवर देखावे, तक्ते, वस्तू यांची मांडणी करण्यात आली होती. सोप्या पद्धतीने २ चा पाढा, सुरक्षेबाबतचे काही विषय, औषधी वनस्पतींची माहिती, शून्य कचरा व्यवस्थापन अशा विषयांवर आमच्या सिनीयर के.जी.च्या मुलांनी उत्तम माहिती दिली.

वर्षभरात मुलांनी केलेल्या कलाकुसरीच्या वस्तू, मुलांसाठीची पुस्तके, सी.डी., तक्ते यांची मांडणी व्हरांडा व वर्गात केली गेली होती.

**होळी**

१० मार्च - विविध रंगांनी नटलेला आनंदाचा सण होळी. होळी साजरा का करतात? याची गोष्ट शिक्षकांनी सांगितली. होळीच्या दुसऱ्या दिवशी साजरी होणारी धुळवड (रंगपंचमी) नैसर्गिक रंगांनी साजरी केली पाहिजे हे सुद्धा मुलांना सांगितले गेले. नैसर्गिक रंग कसे तयार करतात व ते आरोग्याच्या दृष्टीने कसे चांगले आहेत, त्याची माहिती मुलांना दिली गेली.

हळद, फुले, पाने यापासून तयार करण्यात आलेल्या नैसर्गिक रंगांनी शिक्षकांनी मुलांसोबत हा रंगांचा सण साजरा केला.

## बांदोडकर विज्ञान महाविद्यालय

**सुहास्यवदनाने काम (Work With Smile)**



महाविद्यालयातर्फे शिक्षकेतर सहकाऱ्यांसाठी Work With Smile या विषयावर सौ. सुनिता शेजवलकर यांचे व्याख्यान १४ जानेवारी २०१७ रोजी महाविद्यालयाच्या पतंजली सभागृहात संपन्न झाले.

कुठल्याही संस्थेचा विकास हा संख्यात्मक व गुणात्मक पद्धतीने होत असतो. संस्थेच्या विकासात विद्यार्थी, शिक्षक, साधनसामग्री, परिसर हा जसा महत्त्वाचा भाग आहे त्याचप्रमाणे शिक्षकेतर सहकारी देखील मोलाची भूमिका बजावत असतात.

या शिक्षकेतर सहकाऱ्यांना व्यक्तिगत विकासाच्या दृष्टीने पाऊल म्हणून शेजवलकर मॅडमचे व्याख्यान आयोजित केले होते.

यावेळी बोलताना शेजवलकर मॅडमनी आपले अनुभव सर्वांसोबत शेअर केले. सध्या आपल्या कार्यालयात काम करताना अनेक आधुनिक सामग्री उपलब्ध आहे, पण त्याचबरोबर विद्यार्थ्यांशी संवाद देखील साधता आला पहिजे. आपल्या कामाचा योग्य

जेव्हा पैसा तुमच्या हातात असतो तेव्हा फक्त तुम्ही स्वतःला विसरता. पण जेव्हा तुमच्या जवळ पैसा नसतो तेव्हा सगळं जग तुम्हाला विसरतं, हेच जीवन आहे.

आराखडा तयार केला, कामाचे पूर्वनियोजन केले की जास्त धावपळ होत नाही.

कधीकधी महत्त्वाचे निर्णय घ्यायची वेळ येते तेव्हा वरिष्ठांचा आपल्यावरचा विश्वास आपल्याला पाठबळ देतो असा त्यांचा अनुभव येथे सांगितला. वाणी छान ठेवली की सगळी कामे सुरळीत पार पडतात.

तसेच आपल्या व्यक्तिमत्त्व सुधारण्याकरिता आपणदेखील छंद जोपासणे आवश्यक आहे. आपला छंद आपल्यातीलच कामाचा ताण दूर ठेवण्यास आपली मदत करतो अशी कबुली त्यांनी येथे दिली

या कार्यक्रमात ४०हून अधिक शिक्षकेतर सहकारी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ.प्रियांका कोळी हिने केले तर सौ. नामजोशी यांनी सरस्वती वंदना सादर केली. श्री. रामचंद्र शिंदे यांनी केलेल्या आभार प्रदर्शनाने कार्यक्रमाची सांगता झाली.

**राष्ट्रीय छात्र सेना व राष्ट्रीय सेवा योजना यांचे संयुक्त महारक्तदान शिबिर**



राष्ट्रीय सेवा योजना व राष्ट्रीय छात्र सेना यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या महारक्तदान शिबिराचे आयोजन महाविद्यालयाच्या जिमखान्यामध्ये करण्यात आले. या शिबिराला न भूतो न भविष्यती असा प्रचंड प्रतिसाद मिळाला व सकाळी १०.०० ते दुपारी ४.०० या अवधित आयोजित केलेल्या दिवसभराच्या या शिबिरात एकूण १०१ बाटल्या संकलीत झाल्या.

ठाणे जिल्हा सर्वसाधारण रुग्णालयामार्फत आयोजिण्यात आलेल्या या शिबिरामध्ये ठाण्याच्या उपजिल्हाअधिकारी मा. श्री. फरोग मुकादम याही सहभागी झाल्या होत्या. ठाणे सिव्हीलच्या रक्तपेढीच्या पथकाने हे रक्त संकलीत केले. १०१ तरुणांनी या शिबिरात रक्तदान केले.

रक्तदानासारखे Nobel दान नाही व हे करण्यासाठी प्रामुख्याने तरुणांनी अशा शिबिरात मोठ्या संख्येने सहभागी व्हायला हवे. कारण रक्तदान म्हणजे जीवनदान होय. अशा शब्दात महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. माधुरी पेजावर यांनी शुभेच्छा व्यक्त केल्या. तसेच शैक्षणिक व सामाजिक संस्थांनी अशा रक्तदान शिबिरांचे आयोजन वर्षातून दोनदा तरी करावे असे मत ठाण्याच्या तहसीलदार मा. संसारे मॅडम यांनी मांडले.

'लायन्स क्लब ऑफ कांजुरमार्ग' राष्ट्रीय सेवा योजना (NSS) व राष्ट्रीय छात्र सेना (NCC) सहकार्याने आणि NSS च्या संपूर्ण टीमच्या सहकार्याने विशेष परिश्रम घेऊन हे महारक्तदान शिबिर यशस्वी केले.

**इ-कचरा विल्हेवाट मोहीम संपन्न**



इलेक्ट्रॉनिक उपकरणांचा कचरा ही सर्वांनाच सतावणारी समस्या आहे. याकरिता मदतीचा हात पुढे करून विद्या प्रसारक मंडळाचे बा. ना. बांदोडकर विज्ञान

महाविद्यालय व हरियाली ठाणे यांच्या संयुक्त विद्यमाने इ-कचरा विल्हेवाट मोहीम दि. ३० जानेवारी २०१७ रोजी आयोजित करण्यात आली होती.

सकाळी ११.०० ते सायंकाळी ४.०० वाजेपर्यंत आपल्या घरातील इ-कचरा बांदोडकर महाविद्यालयाच्या सांस्कृतिक व्यासपीठावर जमा करण्याचे आवाहन करण्यात आले होते.

या आवाहनाचा महाविद्यालयाचे विद्यार्थी, शिक्षक, शिक्षकेतर सहकारी तसेच शेजारी महाविद्यालयातील लोकांनी देखील प्रतिसाद दिला व मोबाईल चार्जर, बॅटरीज, संगणक, प्रिंटर, फ्रिज, टीव्ही, माऊस, कि-बोर्ड, सीडी, इलेक्ट्रिक वायर्स इत्यादी विविध प्रकारे जवळपास १९०० किलो इ. कचरा जमा झाला होता.

महाविद्यालयाचे NSS, NCC व पर्यावरण शास्त्र विभागाच्या विद्यार्थ्यांनी या मोहिमेत फार मोलाचे कार्य बजावले. वरील सर्व कचरा विभागून ठेवण्याचे काम हे विद्यार्थी करत होते.

आपली आजची तरुण पिढी हेच आपले उद्याचे भावी नागरिक आहेत. या विद्यार्थ्यांनी सामाजिक भान ठेवून स्वच्छ भारत अभियानाच्या कार्यात योगदान दिले.

महाविद्यालयाच्या प्राचार्या, NSS व NCC विभाग प्रमुख, पर्यावरणशास्त्र विभागाचे शिक्षक व शिक्षकेतर सहकारी या संपूर्ण चमूने ही मोहीम आखून एक नवीन पायंडा पाडून दिला आहे. अशाच प्रकारचे विविध पर्यावरणाला पोषक असे कार्यक्रम बांदोडकर महाविद्यालय राबवत होते व यापुढेही राहील अशी ग्वाही प्राचार्या माधुरी पेजावर यांनी दिली.

**छत्रपती श्री शिवाजी महाराज जयंती उत्साहात साजरी**

रविवारी दिनांक १९ फेब्रुवारी २०१७ या दिवशी जाणता राजा छत्रपती श्री शिवाजी महाराजांच्या जयंती



प्रित्यर्थ कॉलेजच्या ग्रंथालयात एका कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. लेफ्टनंट प्रा. बिपीन धुमाळे यांच्या हस्ते शिवाजी महाराजांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला.

शिवाजी महाराजांवरील प्रकाशित अप्रकाशित अशा जीवन चरित्रावरील माहितीचे संकलन करून विद्यार्थ्यांना पुन्हा नव्याने जाणीव व्हावी म्हणून दर्शनी भागात प्रदर्शित करण्यात आली व त्यांच्या जीवन चित्रपटांतूनही विद्यार्थ्यांना प्रोत्साहन मिळावे म्हणून काही चित्रांचे प्रदर्शन भरविण्यात आले. यावेळी शिक्षक व शिक्षकेतर सहकारी व ग्रंथालय शास्त्राचे विद्यार्थीही हजर होते.

शिवाजी महाराजांचे जीवनचरित्र म्हणजे सर्वांनाच एक आदर्श आहे व त्यांचे स्थापत्यशास्त्र, किल्लेबांधाणी, राज्यकारभार इत्यादी गुण म्हणजे एक वास्तुपाठच असे प्रतिपादन यावेळी ग्रंथपाल सौ. कादंबरी यांनी बोलताना केले.

'शिवाजी महाराज एक स्थापत्यकार' यावर लेफ्टनंट प्रा. बिपीन धुमाळे यांनी मते मांडली तसेच शिवाजी महाराजांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून सर्वांनी प्रेरणा घेतली आणि या कार्यक्रमाची सांगता झाली.

**महाविद्यालयाचे वार्षिक बक्षीस वितरण व 'संयुजा' या वार्षिकांकाचे प्रकाशन एअर व्हाईस मार्शल सुनील नानोडकर यांच्या हस्ते संपन्न**



महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी व आता सेवेत असणारे एअर व्हाईस मार्शल सुनील नानोडकर यांच्या हस्ते 'संयुजा' या वार्षिकांकाचे प्रकाशन व वार्षिक बक्षीस वितरण नुकतेच थोरले बाजीराव पेशवे सभागृहात पार पडले. यावेळी विद्या प्रसारक मंडळाचे सहकार्यवाहक श्री. कयाळ, महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. माधुरी पेजावर, उपप्राचार्य डॉ. अशोक पाटील, उपप्राचार्य प्रा. काटकर व इतर मान्यवर उपस्थित होते.

१९७५ ते १९७९ या शैक्षणिक वर्षात श्री. सुनील नानोडकर यांनी बांदोडकर महाविद्यालयातून रसायनशास्त्र विषयातून पदवी मिळवली. त्यावेळच्या सहाध्यायी मित्रांपैकी 'ठाणे वैभव'चे संपादक मिलिंद बल्लाळ, खेळाडू दामले, हायकोर्टाचे ॲडव्होकेट श्रीधर पाटकर, रिलायन्स मधील सिनिअर व्हाईस प्रेसिडेंट राजन गुप्ते इतर मान्यवर उपस्थित होते.

महाविद्यालयात शिकतानाच त्यांनी विमान उड्डाणाचे धडे घेतले व नंतर भारताच्या विमानदलात रूजू झाले. सध्या आपल्या विमानदलाचे ते एअर व्हाईस मार्शल आहेत. त्यांना त्यांच्या कारकीर्दीत वायुसेना पदक व विशिष्ट सेवा पदकही प्राप्त झाले. असे AVM सुनील नानोडकर VM AVM हे बा.ना.बांदोडकर महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी असल्याचा सार्थ अभिमान सर्वच उपस्थितांना सुखावत होता.

महाविद्यालयातर्फे यावेळी माजी शिक्षक व नानोडकर यांचे त्यावेळचे वर्गमित्र आणि आताचे सर्व विभागप्रमुख आणि प्राचार्यांसमवेत स्नेहभोजनाचे आयोजन करण्यात आले होते. ए. व्ही. एम. नानोडकरांनी देखील आपल्या महाविद्यालयातील जुन्या आठवणींना उजाळा देण्यासाठी संपूर्ण दिवस येथे सर्वांबरोबर व्यतीत केला. यावेळी त्यांनी त्यांचे शिक्षक व माजी प्राचार्य यांच्याबरोबर मनमुराद गप्पा मारल्या.

स्नेह भोजनानंतर त्यांनी संपूर्ण महाविद्यालयाच्या परिसराला म्हणजे एन. सी. सी. युनिट, महाविद्यालयाचे सर्व विभाग, प्रयोगशाळा, ग्रंथालय सभागृह येथे प्रत्यक्ष भेट दिली. महाविद्यालयातील एवढा सकारात्मक बदल पाहून ते भारावून गेले होते, व महाविद्यालयाची भरभराट बघून सुखावलेही.



सायंकाळी ४ वाजता बक्षीस वितरणाच्या कार्यक्रमाला सुरुवात होण्यापूर्वी AVM नानोडकर यांचे स्वागत एन.सी.सी.च्या कॅडेटनी शस्त्र सलामी देऊन केले. एन.सी.सी. च्या कॅडेटने यावेळी Obstacle Drill सादर केले. बक्षीस वितरणाच्या या कार्यक्रमात त्यांच्या समवेत त्यांच्या पत्नी सौ. स्वरुपा नानोडकर देखील दिवसभर आवर्जून उपस्थित राहिल्या. तसेच महाराष्ट्र बटालीयनचे कमांडिंग ऑफिसर कर्नल व्ही.बी.एस. बोरा हे देखील दिवसभर उपस्थित होते.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वनस्पतीशास्त्र विभागाच्या डॉ. ऊर्मिला कुमावत यांनी केले. यावेळी महाविद्यालयाच्या काही प्राध्यापक मंडळींनी महाविद्यालयाचे गीत सादर केले. त्याच वेळी AVM नानोडकरांच्या गत आठवणींना उजाळा देण्याकरता महाविद्यालयाच्या प्रगतीची एक चित्रफीत सादर करण्यात आली.

महाविद्यालयाच्या प्रथेप्रमाणे पाहुण्यांचे स्वागत पुस्तकरुपी भेट देऊन करण्यात आले. तसेच महाविद्यालयातर्फे श्री.नानोडकर महाविद्यालयात शिकत असतानाच्या कालावधीतील ''संयुजा'' वार्षिकांकाचा ४ वर्षांचा संच एकत्रित करून त्यांना भेट देण्यात आला. ही अनाखी भेट पाहून श्री. नानोडकर भारावून गेले.

या कार्यक्रमात त्यांनी प्रजासत्ताक दिनी सहभागी झालेल्या ९ एन.सी.सी.कॅडेटचे महाविद्यालयाच्या वतीने सन्मानचिन्ह देऊन गौरविले. त्याचबरोबर सर्व प्रावीण्य संपन्न विद्यार्थी, विविध स्पर्धांमध्ये विशेष कामगिरी केलेले शिक्षक, शिक्षकेतर सहकारी आणि विद्यार्थी यांचा गुणगौरव ए.व्ही.एम. नानोडकर यांच्या हस्ते करण्यात आला.

यावेळी त्यांच्या मनोगतात बोलताना ते म्हणाले की, 'जुन्या काही रसायनशास्त्राच्या शिक्षकांमुळे आपण रसायनशास्त्रा बरोबरच एन. सी. सी.ही करू शकलो. आधी Backbencher म्हणून असणारे आपण आता आकाशाला गवसणी घालतो व Guard of sky ठरतो' असेही ते यावेळी म्हणाले. तसेच यावेळी त्यांनी चालविलेल्या विमानांच्या दोन चित्रप्रतिमा महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. माधुरी पेजावर यांना सुपूर्द केल्या.

प्रा. डॉ. प्रकाश माळी यांनी सर्व बक्षीसांचे वाचन केले. तसेच प्रा. सायली दफ्तरदार यांनी आभारप्रदर्शन केले व राष्ट्रगीताने या नयनरम्य कार्यक्रमाची सांगता झाली.

## बांदोडकर विज्ञान महाविद्यालयात मराठी भाषा गौरव दिनाचा अनोखा जागर



विद्या प्रसारक मंडळाच्या बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालयात ज्ञानपीठकार कविवर्य, नाटककार वि. वा. शिरवाडकर तथा कुसुमाग्रज यांचा वाढदिवस मराठी भाषा गौरवदिन म्हणून साजरा केला गेला. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून भाभा अणुशक्ती केंद्राचे वरिष्ठ वैज्ञानिक व ज्येष्ठ कवी, साहित्यिक सतीश सोळांकूरकर व कविवर्य अरुण म्हात्रे हे उपस्थित होते.

या बहारदार व काव्य-शास्त्र विनोदाच्या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. प्रकाश माळी यांनी केले. प्रथम नृत्याद्वारे गणेश वंदना करण्यात आली. यामध्ये जैवतंत्रज्ञानाच्या प्रथम वर्षात शिकत असणाऱ्या पूर्वा कोल्हे व शिवानी मिस्त्री यांनी एका सुंदर सादरीकरणाचा व नृत्याविष्काराचा अनुभव दिला. यानंतर कुसुमाग्रजांवरील एका माहितीपटाचे प्रक्षेपण केले गेले. त्यानंतर चैताली दोडे या प्रथमवर्ष विज्ञानाच्या विद्यार्थिनीने 'मराठी भाषेची अस्मिता' या विषयावर आपले विचार मांडले. तसेच महाविद्यालयातील मराठी विभागप्रमुख प्रा. बिपीन धुमाळे यांनी या कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. माधुरी पेजावर यांनी केवळ दोन वैज्ञानिक इंग्रजी शब्द वापरून बाकी सर्व आपल्या शुद्ध व प्रमाण मराठी भाषेत केलेल्या भाषणाने सर्वजण आवाक झाले. प्राचार्यांनी 'अवयव दान' यावरील आपले मौलिक विचार मांडले. व अवयवदानाचे महत्त्व सर्वांना पटवून दिले.

तुमच्याशिवाय दुसरा कुणीही तुमच्या सुखासाठी जबाबदार नाही.



या अनोख्या मराठीच्या जागरामध्ये काही अमराठी विद्यार्थ्यांनी कुसुमाग्रजांच्या रचनांचे सादरीकरण केले. त्यामध्ये योगिता पडवेकर यांनी मराठी अस्मितेवर आपले मत मांडले. पल्लवी सिंग या अमराठी विद्यार्थिनीने 'लाभले आम्हांस भाग्य, बोलतो मराठी' ही कविता सादर केली. साहित्य सहवास, जागर जाणिवांचा व सांस्कृतिक मंडळ त्याचबरोबर ग्रंथालय विभागातर्फे कुसुमाग्रज आणि इतर साहित्यकांची ग्रंथसंपदा व साहित्याचे प्रदर्शनही भरविले होते.

आपल्या मनोगतात कवी सतीश सोळांकूरकर यांनी, 'ज्यांनी आईची भाकरी खाल्ली आहे व जे मराठी मातीशी नाळ जोडून आहेत' ते कोणत्याही संकटांना सामोरे जातील व जगावर राज्य करतील', असे विचार मांडले. 'आता आपण २१ व्या शतकात 'मराठी' असल्याचा अभिमान बाळगायला हवा. व मराठीतून व्यवहार केला तरच आपली मराठी टिकून राहील' असा सल्लाही त्यांनी दिला व शेवटी आपली 'आई' वरील कविता सादर केली आणि विद्यार्थ्यांकडून टाळ्यांची दाद मिळविली.

कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन मराठी विभागाच्या प्रा. रोहिणी डोंबे यांनी केले व जैवतंत्रज्ञानाच्या प्राध्यापिका कु. अश्विनी टिळक यांनी सादर केलेल्या पसायदानाने या काव्यशास्त्र विनोदरुपी बहारदार व अनोख्या मराठीच्या जागराची सांगता झाली.

## 'स्त्री आणि स्त्रीत्व' बांदोडकर महाविद्यालयात रंगला तात्विक परिसंवाद'

विद्या प्रसारक मंडळाच्या बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालयाच्या पतंजली सभागृहात 'स्त्री आणि स्त्रीत्व' या एका संवेदनशील विषयावर डॉ. शकुंतला सिंग, प्राचार्या, जोशी-बेडेकर महाविद्यालय यांचे व्याख्यान दिनांक २३ फेब्रुवारी २०१७ रोजी संपन्न झाले.



व्याख्यानात बोलताना त्यांनी नमूद केले की 'स्त्रिया या मुळातच हरहुन्नरी व वेगवेगळ्या स्तरावर काम करणाऱ्या असतात. मातृत्व गुणामुळे काळजी घेणे, जबाबदारीने वागणे हे गुणही त्यांच्यात Inbuilt असतात. 'स्त्री' म्हणून समाजात वावरताना व एक प्राचार्या म्हणून भूमिका निभावताना खूप संमिश्र अनुभव आले. अगदी अनादी काळापासून चालत आलेले हे स्त्रीत्व अभिमानाने मिरवले व जर कुणी मला पुढचा जन्म कोणाचा हवा? हा प्रश्न विचारला तर एका क्षणाचाही विलंब न लावता मी पुन्हा 'स्त्री' म्हणून जन्म घेणे पसंत करेन' असा रास्त अभिमान त्यांनी शेवटी व्यक्त केला.

प्रत्येकाने एखादीतरी कला अंगी जोपासावी जेणेकरून कठीण प्रसंगात मानसिक ताकद ती कला आपल्याला देत असते, असे मत त्यांनी मांडले. तसेच आपल्या सुमधुर आवाजात त्यांनी एक सुंदर हिंदी गीत सादर केले.

यावेळी बांदोडकर महाविद्यालयाच्या प्राचार्यांनीही, 'स्त्रियांची स्वतंत्र ओळख, समाजातील प्रतिमा व

पुरुषसत्ताक मानसिकता' या मुद्यांवर आपली प्रभावी मते मांडली.

या अनोख्या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अनुषा शेख या विद्यार्थिनीने केले. तसेच या कार्यक्रमाचे आभारप्रदर्शन डॉ. विंदा मांजरमकर यांनी केले. २०० च्या वर श्रोते लाभलेल्या या वैचारिक व तात्विक चर्चा घडवून आणणाऱ्या कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने झाली.

**बांदोडकर विज्ञान महाविद्यालयामध्ये 'दैनंदिन जीवनातील आहाराचे महत्त्व' आणि 'आरोग्य विमा' यावर मार्गदर्शनपर व्याख्यान.**

विद्या प्रसारक मंडळाच्या बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालयात द्वितीय सत्राच्या पूर्वसंध्येला महाविद्यालयातील सर्व कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयाच्या शिक्षक व शिक्षकेतर सहकाऱ्यांकरिता दिनांक ०१ मार्च २०१७ रोजी आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. सर्वांच्याच आरोग्याच्या तक्रारींशी निगडित आयुर्वेदाचार्य डॉ. देशपांडे यांचे 'दैनंदिन जीवनातील आहाराचे महत्त्व' या विषयावरील एका आरोग्यदायी व उद्‌बोधनपूर्ण व्याख्यानाचा लाभ सगळ्या सहकाऱ्यांना घेता आला.

आजच्या दैनंदिन जीवनात खाण्याच्या वेळा, अपुरी झोप, बाहेरचे खाणे इ.च्या पार्श्वभूमीवर सामाजिक प्रश्न निर्माण होण्यापर्यंत लोकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. त्यामुळे या विषयावरील एका व्याख्यानाची नितांत गरज होती. असे मत या व्याख्यानाच्या आयोजनाबाबत प्राचार्या डॉ. माधुरी पेजावर यांनी व्यक्त केले.

मध कधीही गरम पाण्यात मिसळून पिऊ नये, जेवणानंतर लगेच पाणी पिऊ नये, जेवताना मध्ये मध्ये थोडे पाणी प्यावे, तूप जेवण्यापूर्वी खावे, म्हणजे ते वंगण म्हणून कार्य करते, विरूद्ध अन्न खाऊ नये त्यामुळे आम्लपित्त वाढते, जेवणापूर्वी गोड खावे, व्यक्तिपरत्वे आहाराची आवश्यकता बदलते. वेळ, सवयी, उपलब्धता, भौगोलिक परिस्थिती यानुसार आहाराच्या संकल्पना व मागणी बदलतात. अशा विविध बाबींवर त्यांनी चर्चा केली. आहाराबरोबर विहार म्हणजेच चांगल्या सवयी व व्यायाम, तसेच निद्रा म्हणजे पुरेशी झोप घेणे, Sound sleep म्हणजे स्वप्नविरहीत झोप येणे आवश्यक आहे इत्यादी कानमंत्र व आरोग्याची गुरुकिल्ली डॉ. देशपांडे यांनी दिली.

शारीरिक काळजीबरोबर आर्थिक नियोजन व योग्य आरोग्य विमा आवश्यक आहे याबाबत सर्वांमध्ये जागरुकता निर्माण होण्यासाठी बँक ऑफ इंडिया येथील ठाणे शाखेच्या कु. रीना व त्यांच्या दोन सहकारी यांचे मार्गदर्शन सर्वांना लाभले.

बँक ऑफ इंडिया याबाबत असलेल्या आरोग्यम या विमा पॉलिसीबद्दल त्यांनी सर्वांना मार्गदर्शन केले. अशा रीतीने सर्व सहकाऱ्यांना महाविद्यालयाच्या प्रगतीचा अहवाल सादर करून, त्यांची स्वतःची शारीरिक व आर्थिक प्रगती होण्याकरिता या दोन्ही व्याख्यानांचे आयोजन महाविद्यालयातर्फे सर्वांसाठी करण्यात आले होते.

श्रोत्यांच्या प्रश्नांना समर्पक उत्तरे देऊन व त्यांच्या शंकांचे निरसन झाले व हा उद्‌बोधक कार्यक्रम यशस्वी झाला.

**बांदोडकर विज्ञान महाविद्यालयात महिला दिनानिमित 'शील व अश्लिल' यावर परिसंवाद**

विद्या प्रसारक मंडळाच्या बांदोडकर विज्ञान महाविद्यालयाच्या जागतिक महिला दिनानिमित्त प्राचार्या. डॉ. माधुरी पेजावर यांचे 'शील व अश्लिल' या विषयावर व्याख्यान महिला विकास कक्षातर्फे आयोजित केले होते.

समाजात वावरताना कामाच्या.नोकरीच्या ठिकाणी पुरुषवर्गाकडून वेगवेगळया शेरेबाजींना सामोरे जावे लागते.

जेव्हा तुम्ही खूप उंचावर उडत असाल तेव्हा लोक नक्कीच तुम्हाला दगड मारण्याचा प्रयत्न करतील; त्यावेळी खाली न बघता आणखी उंच उडण्याचा प्रयत्न करा; जेणेकरून ते दगड तुमच्यापर्यंत पोहोचू शकणार नाहीत.

स्त्री वर्गाने कोणती वस्त्रे परिधान करावीत. उठणेबसणे कसे असावे, खाताना पिताना कसे वर्तन असावे अशा सुचना व शेरेबाजीं मधून पुरुषसत्ताक मानसिकता व विचार किती मागासलेचे आहेत व आजच्या २१ व्या शतकातील स्त्री सर्वच क्षेत्रांत पुरुषांची बरोबरी करित आहे. किंबहूना त्यांच्यापुढेही आपले कौशल्य व कर्तृत्व सिद्ध केले आहे याच पार्श्वभूमीवर 'शील व अश्लिल' या नाजूक़ निषिद्ध व गंभीर विषयावर प्राचार्या डॉ. माधुरी पेजावर यांचे अभ्यासपूर्ण व तत्त्वचिंतनात्मक व्याख्यानाचे आयोजन केले.



'जेव्हा शील म्हणजे शील हे फक्त आणि फक्त स्त्रीयांच्याच बाबतीत व संबधित असते. पुरुष वर्गाला 'शीला' शी काही देणे-घेणे नसते का? की संस्कृती म्हणून फक्त स्त्रियांनीच पाळायची गोष्ट आहे का? प्रत्येक व्यक्तीमध्ये ५०% चांगले व ५०% वाईट गुण हे असतातच परंतु ५०% वाईट गुणांना वर येऊ न देता चांगले वर्तन ठेवणे हे त्या व्यक्तीच्याच हातात असते. अशा तऱ्हेने सर्वांनी दृष्टीकोन ठेवला तर समाजात होत असलेल्या अनुचित प्रकारांना आपसूकच आळा बसेल असा विचार त्यांनी मांडला.

स्त्रीयांनी (भारतात) कोणते कपडे घालावेत? किंवा कोणते कपडे घालू नयेत हे कोण ठरविणा? तर ते स्त्रियाच ठरवतील.

अशा आणि अनेक प्रश्नांची उकल प्राचार्याच्या भाषणातून झाली व इतरही अनेक मुद्द्यांवर प्राचार्यांनी ऊहापोह केला व श्रोतृवर्गाला बोलते केले.

यावेळी प्राचार्यांच्या हस्ते गणित विभागाची विद्यार्थिनी कु. योगिता पडवेकर यांचा तरुण पत्रकार व समाजसेवक म्हणून गौरव झाल्याबद्दल सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाला शिक्षक व शिक्षकेतर सहकारी, विद्यार्थीही आवर्जून उपस्थित होते.

यावेळी संस्कृतिक मंडळाच्या तर्फे आयोजित Treasure Hunt या प्रतियोगितेमध्ये विजयी झालेल्या चमूला प्रशस्तीपत्रक देऊन सन्मान करण्यात आला व राष्ट्रगीताने या कार्यक्रमाची सांगता झाली.

## विद्या प्रसारक मंडळाचे
## ठाणे नगरपालिका विधी महाविद्यालय

१) महाविद्यालयाचे दुसरे, चौथे व सहावे सत्र दिनांक १ फेब्रुवारी २०१७ पासून सुरू करण्यात आले.

२) महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या श्रीमती श्रीविद्या जयकुमार यांचा लेख "Referendum in India-Past Present and Future" मुंबई विद्यापिठाच्या "Law Quest" या मासिकामध्ये प्रसिद्ध झाला. सदरचे मासिक विद्यापिठाच्या विधी विभागाकडून चालविण्यात येते.

३) पदवी प्रदान समारंभ : दिनांक २५ फेब्रुवारी २०१७ रोजी विद्या प्रसारक मंडळाच्या सर्व महाविद्यालयाच्या उच्च श्रेणीत उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांना मंडळाचे अध्यक्ष डॉ. विजय बेडेकर यांच्या हस्ते पदवी प्रदान करण्यात आली. यावेळी महाविद्यालयाचे BGL व LLB उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना पदवी प्रदान करण्यात आली. यावेळी सर्व महाविद्यालयाचे प्राचार्य/प्राचार्या/प्रमुख उपस्थित होते. तसेच दुपारी २.३० वाजता महाविद्यालयामध्ये देखील पदवी प्रदान सोहळा करण्यात

आला. या सोहळ्याचे आयोजक ग्रंथपाल शीतल औताडे ह्या होत्या. यावेळी प्राचार्या व इतर प्राध्यापकांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

४) मराठी दिवस : दिनांक २७ फेब्रुवारी २०१७ रोजी महाविद्यालयामध्ये मराठी दिवस साजरा करण्यात आला. यावेळी कर्मचारी, विद्यार्थी यांनी मराठी भाषेमध्ये विविध कला सादर केल्या.

५) विशेष वर्ग : जनहित याचिका : दिनांक ११ फेब्रुवारी २०१७ रोजी सायंकाळी ६ ते ८ दरम्यान जनहित याचिकेचा मसुदा तयार करण्याच्या पद्धतीवर एका विशेष वर्गाचे आयोजन करण्यात आले होते. मुंबई उच्च न्यायालयाच्या नियमाप्रमाणे विद्यार्थ्यांनी मसुदे समजून घ्यावे हे समारे ठेवून हा वर्ग आयोजित करण्यात आला होता. श्री. मनोज भट यांनी यावेळी मार्गदर्शन केले.

६) महाराष्ट्र कायदे पद्धतीवर विशेष व्याख्यान : डॉ. व्ही. एन. बेडेकर जन्मशताब्दी व्याख्यान मालेचे दुसरे व्याख्यान महाराष्ट्र कायदे पद्धती या विषयावर आयोजित करण्यात आले होते. डॉ. अनंत कलसे, प्रमुख सचिव, महाराष्ट्र विधान भव यांनी या विषयावर विद्यार्थ्यांना सखोल मार्गदर्शन केले. यावेळी 'संविधान व कायदे बनविण्याची पद्धती' या विषयावर सविस्तर माहिती देण्यात आली. विद्यार्थ्यांच्या अनेक प्रश्नांना उत्तरेही देण्यात आली. यावेळी सर्वांनी यात सहभाग घेतला.

७) कागदपत्रे तपासणी : प्रा. विनोद वाघ, श्रीमती रंजन करंदीकर व इतर कर्मचारी यांनी पुणे येथे आयोजित विधी विद्यार्थ्यांची मूळ कागदपत्रे तपासणीसाठी पुण्यास भेट दिली. यावेळी अनेक विद्यार्थ्यांची मूळ कागदपत्रे तपासण्यात आली.

८) कारागृह भेट : ठाणे येथील कारागृहास दिनांक २५ फेब्रुवारी रोजी भेट देण्यात आली. यावेळी ॲड. अरुण गायकवाड प्रो. हेतल मिरोडी यांच्या मार्गदर्शनाखाली ३५ विद्यार्थ्यांनी भेट दिली व कारागृह व त्यांचे नियम समजून घेतले.

९) विधिज्ञ स्पर्धा : महाविद्यालयाने विधिज्ञ स्पर्धा दिनांक २३ व २४ फेब्रुवारी २०१७ रोजी आयोजित केली होती. यामध्ये डॉ. व्ही. एन. बेडेकर वादविवाद स्पर्धा, विधी चाचणी, जनहित याचिका स्पर्धा व विधी साक्षरता स्पर्धा यांचा समावेश होता.

१) डॉ. व्ही. एन. बेडेकर वादविवाद स्पर्धेसाठी मुंबई विद्यापिठाच्या विधी विभागाचे प्रा. शितल कुमार सेठीया व भारतीय रिझर्व्ह बँकेचे डॉ. संकल्प त्यागी हे परिक्षक म्हणून आमंत्रित होते. यामध्ये खालील विद्यार्थ्यांनी बक्षिसे मिळविली.

**उत्कृष्ट संघ**

१) प्रवीण गांधी विधी महाविद्यालय –
 १. मानन धिमान २. आरशिया तकी

२) डॉ. डी. वाय. पाटील विधी महाविद्यालय –
 १. साक्षी राहते २. दीक्षा काथ्यावत

३) व्हि. पी. एम. विधी महाविद्यालय –
 १. पलक गुप्ता २. गौरी दुदुसकर

**वैयक्तिक बक्षीस**

१) पलक गुप्ता – व्ही.पी.एम. विधी महाविद्यालय, ठाणे

२) मानन धिमान – प्रवीण गांधी विधी महाविद्यालय, विलेपार्ले

३) दीक्षा काथ्यावत – डॉ. डी. वाय. पाटील विधी महाविद्यालय, नेरुळ

२) जनहित याचिका ह्या स्पर्धेसाठी 'पर्यावरण व आरोग्य' हा विषय ठेवण्यात आला होता. यासाठी ॲड. राजेश पांचाळ व ॲड. विक्रम वालावलकर हे परिक्षक होते. पुढील विद्यार्थ्यांनी बक्षीस मिळविले.

प्रत्येकाच्या आयुष्यात दुःख असतेच; फक्त त्याला प्रदर्शित करण्याची पद्धत वेगळी वेगळी असू शकते. काही ते त्यांच्या डोळ्यात लपवितात, तर काही त्यांच्या हसण्यात!

**जनहित याचिका उत्कृष्ट संघ**

प्रथम – एस्. एन. डी. टी. लॉ स्कूल, जुहू

दुसरे – नारी गुरुसहानी लॉ कॉलेज, उल्हासनगर

तिसरे – प्रवीण गांधी लॉ कॉलेज, विलेपार्ले

**३) उत्कृष्ट ॲडव्होकेट**

प्रथम – मि. राजेंद्र भट, व्ही. पी. एम. टि. एम. सी. लॉ कॉलेज, ठाणे

दुसरे – प्रेरणा शंकर, प्रवीण गांधी लॉ कॉलेज, विलेपार्ले

**४) उत्कृष्ट मसुदा बक्षीस**

नारी गुरुसहानी लॉ कॉलेज, उल्हासनगर

**५) विधी चाचणी**

प्रथम – मिस. विभूती अग्रवाल – एस्. एन. डी. टी. लॉ स्कूल, जुहू

दुसरे – मिस. निलम राणे – एस्. एन. डी. टी. लॉ स्कूल, जुहू

तिसरे – मिस. श्रीदीप शर्मा – डॉ. डी. वाय. पाटील विधी महाविद्यालय, नेरुळ

६) विधी साक्षरता : विधी साक्षरता स्पर्धेमध्ये कमी स्पर्धक मिळाल्यामुळे सदर स्पर्धा रद्द करण्यात आली.

सर्व विजेत्यांना व स्पर्धकांना ठाणे जिल्हा व सत्र न्यायाधीश माननीय एस. एम. गव्हाने साहेबांच्या हस्ते बक्षीसे वितरीत करण्यात आली.

**१०) स्पर्धा**

१) जळगाव येथील राष्ट्रीय स्तरावरील अभिरुप न्यायालय स्पर्धेमध्ये महाविद्यालयाचा प्रथम विधीचे मनीष भोजवानी, पलक गुप्ता व अशोक गजरे यांनी दुसरे बक्षीस मिळविले.

२) पनवेल येथील विलफिल्ड विधी महाविद्यालय यांनी आयोजित केलेल्या अभिरुप न्यायालय स्पर्धेमध्ये प्रथम विधीचे अक्षत शेखावत यांना उत्कृष्ट वादपटूचे बक्षीस मिळाले.

३) नांदेड येथील शंकरराव चव्हाण विधी महाविद्यालय आयोजित स्पर्धेमध्ये प्रथम विधीचे बालाजी नारायण यांनी दुसरे उत्कृष्ट वादपटूचे बक्षीस मिळविले.

४) डॉ. व्ही. एन. बेडेकर मराठी वादविवाद स्पर्धेमध्ये द्वितीय विधीचे स्वानंद गांगल व अभिषेक यांनी बक्षीस मिळविले.

५) पुणे येथील राजगुरु विधी महाविद्यालय आयोजित स्पर्धेत प्रथम विधीचे निलावती व अंकीत यांनी सहभाग घेतला तर पलक गुप्ता यांनी MLDC आयोजित वादविवाद स्पर्धेत बक्षीस मिळविले.

## विद्या प्रसारक मंडळाचे प्रगत अध्ययन केंद्र

**रुग्णालय व्यवस्थापन विद्यार्थ्यांकरिता रुग्णालय भेट**

विद्या प्रसारक मंडळाच्या प्रगत अध्ययन केंद्रातर्फे रुग्णालय व्यवस्थापन, उद्यानशास्त्र विकास, रेग्युलेटरी अफेअर्स इत्यादी विविध अभ्यासक्रम गेली अनेक वर्ष राबविण्यात येतात. पारंपरिक विद्यापीठात ज्याप्रमाणे अभ्यासक्रमात बदल होतात तसेच या अभ्यासक्रमामध्ये सुद्धा बदल करण्यात आले आहेत ज्याचा फायदा विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष काम करताना होऊ शकेल.

त्यापैकी रुग्णालय व्यवस्थापनच्या विद्यार्थ्यांना अभ्यासक्रमामध्ये 'रुग्णालय भेट' हे नवीन मॉड्यूल सुरू केले आहे. या अंतर्गत या अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांनी ठाणे शहरातील डॉ. बेडेकर हॉस्पिटल, नौपाडा व कौशल्य हॉस्पिटल, ठाणे या रुग्णालयांना भेट दिली.

---

चांगले संबंध म्हणजे एकमेकांचा राग येण, निराश होणं किंवा एकमेकांना त्रास देणं नव्हे तर किती लवकर तुम्ही सगळे विसरता आणि पुन्हा नेहमीप्रमाणे एकत्र येता हे होय.

दिनांक २४ डिसेंबर २०१६ रोजी पाचपाखाडी येथील कौशल्य रुग्णालयाला भेट दिली असता यावेळी रुग्णालयातील विविध भागांची ओळख करून देण्यात आली. तसेच स्वागत कक्षापासून, ऑपरेशन थिएटर, प्रयोगशाळा, एक्सरे रूम मधील कामांचे संयोजन कशा पद्धतीने केले जाते याबाबत माहिती दिली.

रुग्णालयातर्फे आयोजित करण्यात येणाऱ्या विविध आरोग्य तपासणी जसे हेल्थ चेक अप, मधुमेह, उच्च रक्त दाब, ज्येष्ठ नागरिक सुविधा इत्यादींबाबत सविस्तर माहिती देण्यात आली.

दि. १९ जानेवारी २०१७ रोजी बेडेकर रुग्णालयाला भेट दिली. हे रुग्णालय प्रसूती व लहान मुलांचे रुग्णालय अशा स्वरुपाचे आहे. त्यावेळी त्यांनी रुग्णालयातील विविध बाबी जसे प्रसूती गृह, ऑपरेशन थिएटर, नवजात अर्भकांच्या तपासणीकरिता वापरण्यात येणारी अत्याधुनिक साधने, अतिदक्षता विभागाबाबत घ्यावयाची काळजी इत्यादी बाबींबाबत सविस्तर माहिती दिली.

रुग्णालय व्यवस्थापन हा अभ्यासक्रम शिकत असताना या दोन भेटींमुळे प्रत्यक्ष काम करत असताना करावे लागणारे नियोजन विद्यार्थ्यांना कळावे हा मुख्य हेतू या भेटीमागे होता. त्यामुळे भेटीनंतर विद्यार्थ्यांच्या बऱ्याच प्रश्नांची उकल झाली व त्याचा फायदा नक्कीच त्यांना पुढे प्रत्यक्ष काम करताना होईल अशी प्रांजळ कबुली त्यांनी दिली.

अशाच आणखी तीन रुग्णालयांच्या भेटी निश्चीत करण्यात आल्या आहेत.

•••

(पृष्ठ क्र.२५ वरून... **नक्षलवाद व भारत**)

'नक्षलवाद' ही खरोखरच प्रत्येक सुजाण नागरिकाने तिची दखल घ्यावी अशा स्वरुपाची चळवळ आहे. ह्या समस्येचे निराकरण करणे अत्यंत आवश्यक आहे. ही समस्या सोडविण्यासाठी सरकारने चर्चेचा मार्ग स्वीकारून वाट भरकटलेल्या तरुणांना पुन्हा एकदा मुख्य प्रवाहात आणणे गरजेचे आहे. शेतमजूर व आदिवासिंच्या न्याय्य हक्कांचे रक्षण होऊन त्यांचे बलाढ्य व गर्भ श्रीमंतांकडून होणारे शोषण थांबविण्यासाठी प्रशासन सज्ज असायला हवे. विकासाच्या नावाखाली तेलंगण, गडचिरोली, ओडिशा, छत्तीसगढ इत्यादी ठिकाणच्या जंगलांची तोड व जी लूट चालली आहे ती थांबविली पाहिजे. अर्थात, हे काम अतिशय जबाबदारीने केले पाहिजे. अन्यथा, एरवी काही ठेकेदार भ्रष्ट मार्गाने जंगलाची लूट करताना आढळतात. ठेकेदारांनी चालविलेली ही चोरी थांबवून सरकारने खरोखर ह्या परिसरांचा व त्या अनुषंगाने संपूर्ण भारताचा विकास करण्याची वा घडवून आणण्याची काळाची गरज आहे. भारत लवकरच नक्षलवादापासून मुक्त होवो, वाट चुकलेले तरुण नक्षलवादी पुन्हा देशबांधणीच्या पुण्यकर्मात सामील होवोत व भारताची सर्वच बाबतीत उन्नती व प्रगती होवो ही ईश्वर चरणी प्रार्थना! जयहिंद!

**संदर्भ :**


- कोंडी आदिवासींची आणि नक्षलवाद्यांची : हेमंत कर्णिक
- माओइझम इन इंडिया अँड नेपाल : रणजित भूषण
- चायना अ न्यु हिस्ट्री : जॉन किंग फेय्यरबँक व मेर्ले गोल्डमन
- नक्षलाइट मुव्हमेंट इन इंडिया : द स्टेटस् रिसपॉन्स (लेख) : रमन दिक्षीत (जनरल ऑफ डिफेन्स स्टडीज्)


**– सहा. प्राध्यापक सुभाष गं. शिंदे**
उपप्राचार्य व इतिहासविभाग प्रमुख
जोशी-बेडेकर महाविद्यालय, ठाणे.
भ्रमणध्वनी : ९८२०३२८२२६
Email : subhashinscotland@gmail.com

•••

(पृष्ठ क्र. २ वरून - **संपादकीय)**

हे विज्ञानाने नुकतेच सप्रमाण दाखवून दिले आहे (Epigentics). आपल्याला आयुष्यात पुढे होणाऱ्या मधुमेह, हृदयरोगापासून कर्करोगाची मुहूर्तमेढ गर्भातच झालेली असते हेही विज्ञानाने आता सप्रमाण सिद्ध केले आहे. साहजिकच आईवडिलांच्या जनुकांपासून गर्भ वाढीच्या वेळी आईचे खाणे-पिणे, ते तिला सामोऱ्या जाव्या लागणाऱ्या पर्यावरणापर्यंत यांचा संबंध आहे. सूज्ञ आई या सगळ्याची काळजी घेतच असते. गर्भधारणेच्या कालावधीतील आईच्या मनावरील ताबा आणि भावनांच्या कल्लोळांचाही यामध्ये समावेश आहे.

वर निर्देश केलेल्या संशोधनात गर्भधारणा झालेल्या स्त्रीच्या मेंदूमध्ये 'सामाजिक बोधाच्या' (social cognition) क्षेत्रातील दाखवलेले बदल म्हणूनच महत्त्वाचे आहेत,

On the basis of our results, we may speculate that the female brain undergoes a further maturation or specialization of the neural network subserving social cognition during pregnancy. Very few studies have investigated the effects of pregnancy on measures of social congnition, but there are preliminary indications of facilitated processing of social information in pregnant woman, including enhanced emotion and face recognation.

आई आणि बाळाचे हे नाते इतके दृढ असते की, आईची आपल्या मुलांसंबंधात असलेली विशेष 'ओढ' आणि 'ममत्व' याची प्रचीती आपल्या सगळ्यांना केव्हांना केव्हातरी आलेलीच असते. प्राण्यांमध्येही ती आढळून येते.

या प्रयोगांमध्ये आईला आपल्या मुलाचे आणि दुसऱ्या मुलाचे फोटो दाखवण्यात आले. आई जेव्हा आपल्या मुलाचा फोटो बघते तेव्हा Gray Matter कमी झालेल्या मेंदूच्या क्षेत्रामध्ये बदल दिसून येतो. दुसऱ्याच्या मुलाचा फोटो बघतांना हा बदल दिसून येत नाही. Science संशोधन पत्रिकेत या प्रयोगाचे वर्णन खालील प्रमाणे दिले आहे.

The scientist also used MRI (Magnetic Resonance Imaging) scans to watch the women's brains work in real time, as then looked at photos of their own infants and of other babies. Several of brain areas that had lost gray matter during pregnancy responded with the strongest neural activity to their own babies as opposed to the photos of other infants.

महत्त्वाचे संशोधन निबंध, संशोधनपत्रिकांच्या संकेत स्थळावरती छापण्यापूर्वी बऱ्याच आधी प्रकाशित होतात. आपण चर्चा करत असलेला शोध निबंध Nature Neuroscience च्या संकेत स्थळावर १९ डिसेंबर २०१६लाच प्रकाशित झाला. आश्चर्याची गोष्ट म्हणजे BBC, CNN, New York Times, Guardian, Scientific American या सगळ्या दैनिक आणि नियतकालिकांच्या संकेत स्थळांवरती या क्रांतिकारक संशोधनावर टिपण्या लिहून त्याची नोंद घेण्यात आली. गुन्हेगारी, बलात्कार, आणि राजकीय बकवास याचा २४ तास मारा करणाऱ्या आपल्या माध्यमांनी मात्र या संशोधनाची अजूनही दखल घेतलेली दिसत नाही. अर्थातच The Hindu हे दैनिक याला अपवाद आहे.

आईचे तिच्या अपत्याशी असलेले भावनिक नाते हे जन्माआधी गर्भाशयातच प्रस्थापित झालेले असते. ६ व्या, ७ व्या महिन्यापर्यंत गर्भाच्या बहुतेक सर्व अवयवांची वाढ झालेली असते. या सुमारास पोटातील गर्भ पापण्यांची जलदगतीने उघडझाप करतो, जांभई देतो, हसतो, एवढेच काय पण आईचा आवाजही तो ओळखतो आणि त्याला प्रतिसाद द्यायला लागतो. कोलंबिया विद्यापीठातील संशोधकांनी या संदर्भातील केलेले संशोधन बोलके आहे :

"Around the seventh and eighth month, a fetus's heart rate slows down slightly whenever his mother is speaking, indicating that mom's voice has a calming effect.

By the time they're born, babies can actually recognize their mother's voice. In one

---

सर्वात मोठा गुरुमंत्र म्हणजे, आपले गुपित कुणालाही सांगू नका ते तुम्हाला हानिकारक ठरू शकते.

study, doctors gave every day old infants pacifiers that were connected to tape recorders. Depending on the babies sucking paterns, the pacifiers either turned on a tape of their mother's voice or that of an unfamiliar woman's voice. The amazing result : "Within 10 to 20 minutes, the babies learned to adjust their sucking rate on the pacifier to turn on their own mother's voice."

परंपरेमध्ये गर्भधारणेच्या संधिकाळापासून डोहाळ जेवणापर्यंत स्त्रीकरता केल्या गेलेल्या काव्यांचा उद्देश आणि परिणाम हाच असणार.

माधव ज्युलीयन, साने गुरुजी किंवा विनोबा भावे हे कुणीही वैज्ञानिक नव्हते. स्त्री संबंधातील त्यांचे विचार उदारमतवादी होते. जीवनातील वास्तव आणि अनुभव स्वीकारताना त्यांच्या संवेदना बधीर झाल्या नव्हत्या. म्हणूनच चीरकाळ टिकणारे सृजनशील साहित्य आणि काव्य ते निर्माण करू शकले. जगामध्ये सगळेच पुरुष, किंवा सगळ्याच स्त्रिया असत्या, तर जगाची निर्मितीच थांबली असती. मानव जातीच्या अस्तित्वाकरता 'पुरुष' आणि 'स्त्री' हे दोन्हीही घटक तेवढेच महत्त्वाचे आहेत. त्यांची आपली स्वतंत्र व्यक्तिमत्त्व वैशिष्ट्ये आहेत. हीच वैशिष्ट्ये त्यांच्यामध्ये भिन्नताही निर्माण करतात. 'स्वातंत्र्य' आणि 'मुक्ती'च्या बहकलेल्या संकल्पनांनी या वैशिष्ट्यांचे सपाटीकरण चालू केले.

औद्योगिक क्रांतीनंतर 'कारखानदारी' आणि 'उत्पादन' या प्रगती मोजण्याच्या फुटपट्ट्या होऊन गेल्या. उत्पादित वस्तूंची विक्री आणि त्यात सतत वाढ हाच व्यक्ती, समाज, आणि देशाच्या यशाचा महत्त्वाचा भाग झाला. अर्थातच या वाढीकरता मनुष्यबळाचा वापर अपरिहार्य होता. पुरुषाप्रमाणेच स्त्रीलाही या पुरवठ्यात सामील करून औद्योगिक क्रांतीची ही गरज आज आपण मोठ्या प्रमाणावर भागवली आहे.

स्त्रीच्या कौटुंबिक आणि सामाजिक व्यवस्थेच्या परिवर्तनाला येथेच सुरुवात झाली. केसापासून वेषापर्यंत स्त्रीला 'पुरुषा'र्थी करण्याची चळवळ येथूनच चालू झाली. 'आधुनिक', 'पुरोगामी', 'व्यवसाय सुलभ' अशा अनेक 'मुक्त' वेष्टनाखाली स्त्रीमधील 'स्त्रीत्व'च 'लुप्त' करण्यात आज आपण बरीच प्रगती केली आहे.

औद्योगिक क्षेत्रांमध्ये क्रांती करणाऱ्या पाश्चात्य संस्कृत्यांमध्ये कुटुंबसंस्था आणि त्यातून निर्माण होणाऱ्या नातेसंबंधांची मोडतोड झाली. एवढेच नाही तर त्या सगळ्या संस्थाच मोडीत निघाल्या. अशा समाजनिर्मिती करता पुरुष आणि स्त्रियांच्या खाण्यापिण्यापासून सांस्कृतिक जीवनशैलीमध्ये बदल घडत गेले. यात सर्वांत मोठा आघात झाला तो स्त्रियांच्या सृजनक्षमतेमध्ये. समाज जास्तीतजास्त आत्मकेंद्रित व्हायला लागला. आईच्या मातृत्वाशी निगडित संवेदनांना बधीर करून आईलाच 'रिटायर्ड' करायला आपण सुरुवात केली. नाटक, सिनेमा, कला, साहित्य ही सगळी माध्यमं आज याकरता सक्रिय आहेत. स्त्रीला 'चूल' आणि 'मूल' यापासून मुक्त करणे म्हणजेच 'स्वातंत्र्य' अशा संकल्पनांचा उगम या जीवनशैलीमधूनच झाला. याही पुढे जाऊन पुरुषानेच स्त्रीच्या पायात अडकवलेल्या या 'बेड्या' आहेत, असले जावई शोधही लावले गेले.

स्त्रीला खरंच तिच्या मुलापासून मुक्त करता येईल का? स्त्रीच्या नैसर्गिक सृजनक्षमतेच्या वैशिष्ट्याचा आदर हाच तिच्या स्वातंत्र्याचा खरा सन्मान नाही का?

आजचे आपले विज्ञान याशिवाय वेगळे काय सांगते?

**डॉ. विजय बेडेकर**

•••

Posting under the Reg. No. MH/MR/TNC-27/2004-2006

# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

- अत्याधुनिक दृक्‌श्राव्य यंत्रणा
- वातानुकूलित प्रसन्न वातावरण
- वाहने उभी करण्यासाठी प्रशस्त जागा

अशा सुविधांनी युक्त

| सभागृहाचे नाव | ठिकाण | आसन क्षमता |
|---|---|---|
| थोरले बाजीराव पेशवे सभागृह | महाविद्यालय परिसर | ३०० |
| कात्यायन सभागृह | कला/वाणिज्य इमारत, ३ रा मजला | १६० |
| पातंजली सभागृह | बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालय इमारत | १६० |
| पाणिनी सभागृह | डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्था इमारत | १८० |
| मनु सभागृह | वि.प्र.मं.चे ठाणे नगरपालिका विधी महाविद्यालय इमारत | २५० |

## संपर्क

कार्यवाह

**विद्या प्रसारक मंडळ**

विष्णूनगर, नौपाडा, ठाणे – ४०० ६०२

दूरध्वनी क्रमांक – २५४२६२७०

हे मासिक प्रकाशक आणि संपादक डॉ. विजय वासुदेव बेडेकर व मुद्रक श्री. विलास सांगुर्डेकर, परफेक्ट प्रिण्टस्, नुरीबाबा दर्गा रोड, ठाणे-४०० ६०१ या मुद्रणालयामध्ये छापून विद्या प्रसारक मंडळ, जिल्हा ठाणे-४०० ६०२ यांच्याकरिता विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर, विष्णूनगर, ठाणे - ४०० ६०२ इथून प्रकाशित केले.